केडगाव, अहमदनगरमध्ये
प्लॉट हवाय? प्लॉट विकायचा?
घर हवंय? घर विकायचंय?
जमीन हवी ? जमीन विकायचीय?
* ३० वर्षांची विश्वसनीय सेवा *
SHIVAM PROPERTIES
शिवम प्रॉपर्टीज
संपर्क - 9822116347, 9881620700

RNI No. 6153/57

# समाचार
SAMACHAR

उपवासाची कारणे अनेक,
शाबुदाणा मात्र एक..
1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
कॅमल
सुपरफाईन शाबुदाणा
कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
स्टॉकिस्ट अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहमदनगर. (0241) 2343896/2341196

Volume - 73 | Issue- 142 | Marathi Daily | Tuesday 4/2/2025 | Pages - 6 | Price- Rs. 3

अग्रलेख: गुंतवणूक सत्कारणी लागायची तर.. पान २


आनंद योग केंद्रात रंगला हळदी कुंकू कार्यक्रम पान ३


नगरच्या नताशाचे चेन्नईत नृत्यात प्राविण्य पान ५

## उठाठेव
– विवेक मेहेत्रे


'शाब्दिक हल्ला करून प्रसिद्धी' या अर्थी ३ अक्षरी आडनाव हवंय... काय लिहू मी? ''राऊत'' की अन्य??

# संभाव्य पाणीपट्टी वाढ
# महासभेच्या निर्णयाकडे लक्ष!

**समाचार/नगर-दि.४**

महापालिकेच्या स्थायी समितीने १५०० रुपयांची पाणीपट्टी ३००० रुपये म्हणजे दुप्पट करण्याची शिफारस महासभेला केलेली आहे. या संभाव्य दरवाढीला विरोध झालेला आहे. पाणीपट्टी वाढवण्यावर महापालिका प्रशासन ठाम आहे. दरम्यान, पुढील आठवड्यात महासभा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाढीव पाणीपट्टीबाबत महासभा काय निर्णय घेणार, याकडे लक्ष लागले आहे.

पाणीपट्टीत दुपटीने वाढ करण्याच्या निर्णयास आमदार संग्राम जगताप यांच्यासह काही माजी नगरसेवकांनी विरोध केला आहे. पाणीपट्टी वाढवण्यावर महापालिका प्रशासन ठाम असून याप्रश्नी मध्य मार्ग काढण्याच्या विचारात महापालिका प्रशासन असल्याचे समजते. आर्थिक अडचणीत सापडलेल्या



महापालिकेने तब्बल २१ वर्षानंतर पाणीपट्टीत वाढ करण्याचा निर्णय घेतला. स्थायी समितीच्या बैठकीत १५०० रुपयांची पाणीपट्टी ३००० रुपये म्हणजे दुप्पट करण्याची शिफारस करण्यात आली. या संभाव्य दर वाढीला विरोध करण्यात आलेला आहे. आधी शहरातील पाणीपुरवठा सुरळीत करा, अशी मागणी

माजी नगरसेवकांनी केली आहे. शहराच्या पाणी पुरवठा योजना व वितरण व्यवस्थेवर होणाऱ्या खर्चात दरवर्षी मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. दुसरीकडे गेल्या २१ वर्षांपासून पाणीपट्टी वाढवण्यात आलेली नाही. त्यामुळे पाणीपट्टीतून मिळणारे उत्पन्न व पाणी योजना व वितरण व्यवस्थेवर होणारा खर्च यातील तफावत मोठ्या प्रमाणात वाढली आहे. परिणामी, पाणी योजनेची वीज बिले देण्यात मोठ्या अडचणी निर्माण झाल्या आहेत. शहराची पाणी पुरवठा योजना व वितरण व्यवस्था सुरळीत राहावी, यासाठी महापालिकेने घरगुती वापराच्या पाणीपट्टीच्या दरात वाढ करण्याचा निर्णय घेतला असल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे. आता लवकरच महासभा होणार आहे. या महासभेत पाणीपट्टीबाबत काय निर्णय होतो, हे महत्वाचे ठरणार आहे.

## निवडक
### मुंबई महापालिकेचा ७४ हजार कोटींचा अर्थसंकल्प




**मुंबई, दि.४–** मुंबई महापालिकेचा २०२५–२६ या आर्थिक वर्षातील ७४४२७.४१ कोटी रूपयांचा अर्थसंकल्प अतिरिक्त महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी मंगळवारी रोजी महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे सादर केला. चालू आर्थिक वर्षाच्या तुलनेत आगामी अर्थसंकल्पाचे आकारमान ९२४६.६२ कोटी रुपयांनी अधिक असून आगामी अर्थसंकल्प १४.१९ टक्क्यांनी अधिक आहे. विविध विकास कामांसाठी ४३१६५.२३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. चालू आर्थिक वर्षात सुशोभिकरण, रस्त्यांचे सुरू असलेले काँक्रीटीकरण, त्याचबरोबर हाती घेतलेल्या मोठ्या प्रकल्पांसाठी महापालिकेला मोठा निधी खर्च करावा लागला आहे. महापालिकेच्या ठेवी त्यासाठी मोडाव्या लागल्या होत्या. ही बाब लक्षात घेऊन महसूलवृद्धीवर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे.

### मनपा आयुक्तांचे आदेश; बांधकाम, पाणीपुरवठा विभागाकडून पाहणी
# शहरातील रस्त्यांच्या कामांमुळे विद्यार्थ्यांची अडचण नको

**समाचार/नगर-दि.४**

मनपामार्फत शहरात विविध ठिकाणी रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. यात प्रमुख रस्त्यांवर असलेल्या महाविद्यालय व शाळांच्या परिसरात कामे सुरू आहेत. पुढील आठवड्यात दहावी व बारावीच्या परीक्षा सुरू होणार आहेत. परीक्षा काळात रस्त्यांच्या कामामुळे विद्यार्थी, पालक व शिक्षक, शाळांच्या कर्मचाऱ्यांना त्रास होऊ नये, या दृष्टीने तत्काळ रस्त्याच्या कामांची पाहणी करून उपाययोजना कराव्यात, असे आदेश आयुक्त यशवंत डांगे यांनी बैठक घेऊन बांधकाम विभागाला दिले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी तत्काळ रस्त्यांची पाहणी केली.



लवकरच दहावी व बारावीच्या परीक्षा सुरू होणार आहेत. त्यामुळे सारडा कॉलेज, न्यू आर्ट्स कॉलेज, रेसिडेन्शियल हायस्कूल, फिरोदिया हायस्कूल, केडगाव येथील अंबिका विद्यालय आदी भागात सुरु असलेल्या व सुरू होणाऱ्या रस्त्यांच्या कामांचा आढावा डांगे यांनी घेतला. पत्रकार चौकापासून ते दिल्लीगेट रस्त्याचे काम सुरू आहे. या मार्गावर सारडा, न्यू आर्टस्, रेसिडेन्शियल कॉलेज आहेत. लालटाकी येथे शाळा आहे. तसेच, वाडिया पार्क संकुलासमोर फिरोदिया संस्थेच्या तीन शाळा व इतर शाळा आहेत. तेथील कामांना गती देऊन प्रत्यक्ष पाहणी करावी. काम तत्काळ पूर्ण होणार नसले, तरी परीक्षा काळात शाळेत अथवा महाविद्यालयात येण्या-जाण्यासाठी विद्यार्थी, पालक व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांना अडचणी येणार नाहीत, या दृष्टीने उपाययोजना कराव्यात. बांधकाम विभागासह पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष जाऊन पाहणी करावी व शाळा, कॉलेज परिसरात प्रलंबित असलेली कामे करून घ्यावीत, अशा सूचना त्यांनी दिल्या. शहरासह केडगाव येथे अंबिका विद्यालय परिसरात रस्त्याचे काम सुरू होणार आहे. त्या ठिकाणीही समक्ष पाहणी करून शाळेत जाण्यासाठी अडथळे होणार नाहीत, यादृष्टीने नियोजन करून काम सुरू करावे, असे त्यांनी सांगितले.

# नगरमध्ये जीबीएसचे संशयीत चार रूग्ण

**समाचार/नगर-दि.४**

गुलीयन बॅरी सिंड्रोम (जीबीएस) नावाच्या आजाराने पुण्यात थैमान घातले असतानाच नगर शहरातील रुग्णालयात जीबीएस संशयित चार रुग्ण आढळल्याचे समोर आले आहे. हे चौघेही रुग्ण शहराबाहेरील असून एकाला पुणे येथे तपासणीसाठी पाठवण्यात आले आहे. तर, तिघांवर शहरातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. त्यांची प्रकृती सुधारत असल्याचे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सांगितले.



जिल्हा रुग्णालयात एक अल्पवयीन मुलगी जीबीएस संशयीत आढळल्याने तिला तपासणीसाठी पुणे येथे पाठवण्यात आले आहे. सदर मुलगी ही जिल्ह्याबाहेरील असल्याचे सांगण्यात आले. तर, शहरातील खासगी रुग्णालयात तीन संशयित रुग्ण आढळल्याची माहिती महापालिकेकडे प्राप्त झाली आहे. त्या तिघांची प्रकृती स्थिर असून सुधारणा होत आहे. खासगी रुग्णालयात आढळलेले रुग्ण आष्टी (बीड), वाकोडी व राहुरी तालुक्यातील आहेत. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू असल्याचे महापालिकेकडून सांगण्यात आले.

दरम्यान, गुलीयन बॅरी सिंड्रोम हा संसर्गजन्य आजार नसल्याने नागरिकांनी घाबरून जाऊ नये. शहरात खासगी रुग्णालयात आढळलेले रुग्ण शहरातील नाहीत. त्यांची प्रकृती स्थिर असून सुधारणा होत आहे. या आजाराच्या पार्श्वभूमीवर महापालिकेकडून उपाययोजना सुरू करण्यात आल्या आहेत. संशयित रुग्ण आढळल्यास महापालिकेला कळवण्याच्या सूचना खासगी रुग्णालयांना देण्यात आल्या आहेत, असे महापालिका आरोग्य विभागाने म्हटले आहे.

### विधानसभेला आघाडीत श्रीगोंद्याऐवजी नगर शहराची जागा लढविली असती तर...
# 'ती' एक चूक महागात पडली अन् ठाकरेसेनेला खिंडार पडले!


**नंदकुमार सातपुते**

**समाचार, नगर-दि.४-** १९९० ते २०१४ ही २५ वर्षे शिवसेनेने नगर शहरावर एकहाती वर्चस्व गाजविले. शिवसेना-भाजपा युतीच्या माध्यमातून शिवसेनेने शहराची आमदारकी तब्बल पावशतक आपल्या ताब्यात ठेवली. १९९५ मध्ये युती सरकारच्या काळात स्व. अनिल राठोड राज्यमंत्रीही झाले. २०१४ च्या निवडणुकीत पहिल्यांदा युतीला ग्रहण लागले आणि हिंदुत्वाच्या प्रमुख मुद्द्यावर एकत्रित असलेले शिवसेना-भाजपा हे दोन्ही पक्ष एकमेकांच्या विरोधात उभे ठाकले. परिणामी युतीच्या मतांची विभागणी झाल्याने नगरमध्ये स्व. अनिल राठोड अन् शिवसेनेलाही शहरात पहिल्यांदा निसटत्या पराभवाचा सामना करावा लागला. २०१९ च्या निवडणुकीत भाजपा-शिवसेनेची युती असतानाही स्व. राठोड सलग दुसऱ्यांदा पराभूत झाले. त्यास युतीतील उमेदवारीची अंतर्गत नाराजीही कारणीभूत



ठरली. २०२४ मधील निवडणुकीच्या अडीच वर्षे आधीच राज्यात शिवसेना दुभंगली. तरीही नगर शहरात निष्ठावंताच्या बळावर ठाकरेसेनेने आपली ताकद टिकवून ठेवली. लोकसभेला आघाडीचे उमेदवार खा. निलेश लंके यांच्या विजयात ताकदीने हातभार लावला. साहजिकच २५ वर्षे शिवसेनेचा बालेकिल्ला राहिलेल्या नगर शहरातून विधानसभा निवडणूक लढविण्याची जोरदार तयारी पक्षाच्या एकनिष्ठ पदाधिकाऱ्यांनी केली. मात्र आघाडीच्या जागावाटपात महत्वाची भूमिका बजावणाऱ्या शिवसेना नेत्यांनी येथेच चूक केली. नगर शहराऐवजी श्रीगोंदा विधानसभा लढविण्याचा निर्णय घेतला गेला. याबाबत नगर शहरातील पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या भावना विचारात घेतल्या गेल्या नाहीत. त्यातूनच शिवसेनेशी वर्षानुवर्षे एकनिष्ठ असणारे, अगदी शिवसेनेच्या फुटीनंतरही पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशीच निष्ठा ठेवणारे नगर शहरातील प्रमुख पदाधिकारी दुखावले गेले. विधानसभा निवडणुकीत शहरात आघाडी पराभूत झाली. त्यानंतरही नाराज निष्ठावंताची समजूत काढण्याचा प्रयत्न पक्षश्रेष्ठींकडून झाला नाही. या सर्वाचा परिणाम ठाकरे सेनेच्या १२ नगरसेवकांसह पक्षाचे शहरप्रमुख आदि तब्बल ४० आजी माजी प्रमुख पदाधिकाऱ्यांनी पक्षाला जय महाराष्ट्र केला आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची वाट धरली. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे सेनेला नगर शहरात मोठे खिंडार पडले, त्यातून शिंदेसेनेला मात्र मोठे बळ मिळाले. चार महिन्यांपूर्वी झालेल्या विधानसभा निवडणुकीत मोठे यश मिळाल्याने राज्यातील काही ठिकाणी ठाकरे सेनेचे काही प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते शिंदेसेनेत प्रवेश करीत आहेत.

(पान ३ वर)



कमी ऐकू येते का ?
signia Life sounds brilliant... कंपनीचे अधिकृत विक्रेते
● न दिसणारे डिजीटल श्रवण यंत्र
● ३१ वर्षापासून सेवेत
● इंग्लडमधील अनुभव असलेले ऑडिओलॉजिस्ट
● लहान मुलांच्या तपासण्या ● स्पीच थेरपी
स्थापना : १९९२
साई हिअरिंग क्लिनिक
15% Discount
साई सर्जिकल ॲण्ड हिअरिंग सर्व्हिसेस
मुख्य शाखा : कोहिनूर प्लाझा (बेसमेंट), पत्रकार चौक, लोकमत भवन शेजारी, अहमदनगर.
मो. 83800 41240
शाखा नं. १ : शॉप नं. १५, डी.पी. रोड, शिवतारा गार्डन, गणेश सोसायटी, चैतन्यनगर, कोथरूड, पुणे. मो. 9028075405
वेळ : सकाळी १० ते सायं. ७ (रविवार बंद)


ADMISSION OPEN 2025-26
Nursery | LKG | UKG
Class I[st] To IV[th]
● Trained, Experienced, Dedicated & Caring Staff.
● Smart Class (Education Through Computer)
● CCTV monitored centre. ● Motivational Lectures.
● Modern Playground Equipments.
Hind Seva Mandal's
MEHER ENGLISH SCHOOL AND CARE & EDUCATION PRE-PRIMARY SCHOOL
Patwardhan Chowk, Anandi Bajar, Ahilyanagar 414 001.
Contact : 0241 - 2325328 | Mobile : 8956627925
Principal
Anurita Zagade

JAYDEEP B. KULKARNI
B.E. (Civil), MIE, FIV
Chartered Engineer & Approved Valuer
Office : Shop No. 1, Runanubandh Renuka, Prof. Colony Chowk, Savedi, Ahmednagar - 414003. | Mo. : 9822049099
Resi. : "Shubham", Suyog Grih Mandal, Neal Prof. Colony, Savedi, Ahmednagar - 414 003
Tel. : (0241) 2422459

Shri.Kesharchand Gulabchand Munot, Newaskar Sarvajanik Trust's
(Religious Minority Trust)
ISO 9001-2015 Certified College & Green Compliance NAAC Accredited
K.G.College of Art's & Commerce
I.D.No. PU / AC / 095/ 2007 (Night College)
(Affiliated to the Savitribai Phule Pune University), (Permanent Non Grant Basis)
Pandit Nehru Hindi Vidyalay Campus, Fort Road, Near L.I.C. Office, Ahilyanagar - 414 002. Tel. (0241) 2326960
E- mail : kg.college@yahoo.com / Website - kgcollege.in
WANTED
Invites Application for the following posts for Acadmic year 2025-26

| No. | Post | Subject | Qualification | No. of Post |
|---|---|---|---|---|
| 3 | Clark | Office Clark | B.A./ M.A. / B.Com./ M.Com | 01 (Full Time) |

Apply within 08 days from the publication of this advertisement.
Ahmednagar.
Dt. 04/02/2025
Mr. Kishor Hastimal Munot
Trustee Director

भावपूर्ण आदरांजली
आमच्यासाठी गीतासार तुम्ही..
आमच्यासाठी कर्मसिध्दांत तुम्ही..
आमच्यासाठी प्रेरणास्त्रोत तुम्ही..
आमच्या आठवणीत सदैव तुम्ही...

२६ व्या पुण्यस्मरण दिनी आमची भावपूर्ण आदरांजली !
स्व. रामचंद्र बापूराव तथा आर.बी. कुलकर्णी
स्व. दि. ४-२-१९९९


मे. आर.बी.कुलकर्णी
हार्मोनियम मेकर्स ॲण्ड तबला मर्चंट
महाजन गल्ली कोपरा, अ.नगर. फोन : २३४५९७१
मो. ९८२२०७५४२२, ९८५०२९१४२२

संपादकीय

# गुंतवणूक सत्कारणी लागायची तर...

विकासाच्या वाटेवर देश वेगाने पुढे निघाला असला तरी अद्यापही आपल्याकडे व्यवसाय-धंद्याला पूरक वातावरणाचा अर्थात 'ईज ऑफ डुईंग बिझनेस'चा अभाव आहे. जमिनींची उपलब्धता, स्थानिकांचा विरोध, राजकीय डावपेच याचे प्रमाण बरेच जास्त आहे. अगदी छोट्या प्रकल्पातही राज्य सरकारपासून ग्रामपंचायतीच्या पातळीपर्यंत अनेकजण सहभागी असतात. त्याचप्रमाणे पाणी, विजेची उपलब्धता ट्रान्स्फॉर्मर बसवणे, पर्यावरणविषयक परवाने मिळणे हे सगळेच विषय आड येऊ शकतात. विशेषत: पर्यावरणविषयक परवाने केवळ राज्य सरकारकडून नव्हे तर, केंद्र सरकारकडूनही मिळवावे लागतात. स्वाभाविकच ही बाबही कटकट आणि वेळ वाढवणारी असते. इतके सगळे करुन व्यवसायाला परवानगी मिळाली तरी कोणी तरी जनहित याचिका दाखल करुन न्यायालयाचे दार ठोठावते आणि अवघा प्रकल्प अनिश्चित काळासाठी रखडतो. त्यामुळेच दर वर्षी दावोससारख्या ठिकाणी किंवा अन्यत्र सरकारचे उद्योजकांशी सामंजस्य करार होत असले तरी त्यातील सगळेच प्रकल्प प्रत्यक्षात येत नाहीत. २०१९ ते २०२४ पर्यंतच्या कालखंडाचा अंदाज घेतला तर या काळात आलेल्या परकीय गुंतवणुकीचा महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेला आकडा सहा ते सात लाख कोटींची गुंतवणूक दर्शवतो. दिशादर्शनासाठी हा आकडा केंद्रस्थानी ठेवला तरी आता पुढे आलेला १६ लाख कोटींचा आकडा किती मोठा आहे, हे स्पष्ट होऊ शकते. त्यामुळेच प्रकल्पामध्ये प्रत्यक्ष किती कामी येतात हे पुढचा काळ दाखवून देईल. साधारणपणे हे प्रमाण तीस ते ५० टक्के असू शकते. मात्र सध्या मुख्यमंत्री ते ६५ टक्के राहण्याचा दावा करत आहेत. म्हणजेच १६ लाख कोटीमधील किमान ६५ टक्के रक्कम प्रत्यक्षात गुंतवली गेली तरी राज्यात पुढील काळात दहा लाख कोटींचे प्रकल्प उभे राहू शकतात, अशी आशा करायला हरकत नाही. त्यानुसार १६ लाख कोटींच्या गुंतवणुकीतून १६ लाख रोजगार उत्पन्न होतील, असे सांगितले जात आहे. पण प्रत्यक्षात गुंतवणुकीची ही सगळी क्षेत्रे अत्यंत उच्च तंत्रज्ञानाचा वापर होणारी आहेत. स्वाभाविकच तिथे खूप कमी प्रमाणात कामगार लागतील कारण आता आपण कृत्रिम बुद्धिमत्ता वा तत्सम अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणार आहोत. त्यामुळेच कर्मचाऱ्यांची संख्या कमी कमी होत जाईल. पूर्वी एखाद्या कारखान्यात शंभर कामगार लागत असतील तर आता तो वीस कामगारांच्या साह्याने चांगल्या पद्धतीने चालवता येऊ शकतो. मग रोजगाराचा हा आकडा गृहीत कसा धरला जातो, या प्रश्नाचे उत्तर म्हणजे कोणत्याही उद्योगात एका व्यक्तीला रोजगार निर्माण झाला तरी त्याच्याशी संबंधित आजूबाजूच्या उद्योगांना चालना मिळत असते. मग त्यात अगदी हॉटेल व्यावसायिक, पानवाले, चहावाले, टॅक्सीवाले आदिंचा समावेश असतो. ही संख्या साधारणपणे आठ इतकी असल्याचे मानले जाते. म्हणजेच एक रोजगार निर्माण झाला तर अन्य आठ रोजगारांना चालना मिळते. एकत्रितपणे ही संख्या नऊ इतकी होते. याच गणितानुसार येत्या काळात निर्माण होणाऱ्या रोजगारांची संख्या १६ लाख इतकी सांगितली जात आहे. अर्थातच या सगळ्यासाठी लागणारा कुशल कामगार आपल्याकडे आहे का? हादेखील विचारात घेण्याजोगा मुद्दा आहे. या सर्व पार्श्वभूमीवर येत्या काळात सरकार पायाभूत सुविधांवर भर देणार असल्याचे समोर येते. केंद्र तसेच राज्य सरकारचा हाच प्रयत्न असेल. हे सगळे उद्योग आपल्याकडे आणण्यासाठी त्याची आवश्यकता आहे. त्यासाठी राज्यातील सगळ्या जिल्ह्यांना जोडणारे रस्ते तयार करण्यास प्राधान्य असेल  कारण हे साधले तर व्यावसायिकांची मोठी सोय होऊ शकेल. या दृष्टीने एमएमआरडीएकडे तीन हजार किलोमीटर लांबीचे महामार्ग बांधण्याच्या प्रकल्पावर काम सुरू आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करत असल्याचे मागेच घोषित करण्यात आले आहे.  रस्त्यांच्या या जाळ्याचा राज्याला नक्कीच फायदा होईल, कारण अंतर्गत वाहतूक सुधारली तर व्यवसायांचा खर्च वाचतो आणि उद्योग राज्याच्या बाहेर जाण्याचा धोकाही कमी होतो. मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणावर विकसन कार्य सुरू आहे. पुढील पाच वर्षांमध्ये सरकारकडून पायाभूत सुविधांना बळकटी देणारे जवळपास पन्नास प्रकल्प राबवण्यात येणार आहेत. त्यामध्ये मेट्रोचे १६ ते १७ मार्ग, त्यातील २५० स्टेशन्सची बांधणी, उड्डाणपूल, दोन भाग जोडणारे रस्ते, लिंक रोड आदिंचा समावेश आहे. त्याचबरोबर वीज स्वस्त करण्यासाठी हरित ऊर्जा प्रकल्पांना चालना देण्यावर सरकारचा भर राहणार आहे. त्यासाठी एक कंपनीबरोबर हायड्रोजन प्रकल्प विकसन करण्यासंदर्भात सामंजस्य करार केला असून त्यात ६० ते ७० कोटींची गुंतवणूक होणार आहे. यातून उत्पन्न होणाऱ्या हरितऊर्जेची किंमत कमी असेल. येत्या काळात याच ऊर्जेचा वापर मेट्रोसारख्या प्रकल्पांमध्ये होईल.पुढील काळात आपल्याला एमआयडीसीसारख्या क्षेत्रांचा विकासही करावा लागेल. तिथेही मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करुन संबंधित भाग सर्व सुविधांनी युक्त करण्याचा प्रयत्न असेल. यायोगे आपल्याकडे परदेशी गुंतवणूक मोठ्या प्रमाणात येऊ शकते. सध्या रिअल इस्टेटही प्रचंड प्रमाणात वाढत आहे. मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर अशा सर्वच मोठ्या शहरांमध्ये हे क्षेत्र वाढत आहे. मात्र तेथील नागरी सुविधांवर याचा ताण वाढत असून तो कमी होण्यासाठीही त्या त्या ठिकाणी अनेक प्रकल्प कार्यान्वित करण्यात येणार आहेत. पुण्यातील वाढते आणि विस्तारते मेट्रो प्रकल्प, येथे आकार घेणारे नवीन विमानतळ उदाहरणादाखल घेता येईल. मुंबईजवळ नवीन बंदराची उभारणी होत आहे. हे वाढवण बंदर पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यास उद्योगाला चालना मिळण्यास मोठी मदत होणार आहे. मुख्यत: याचा नाशिकमधील उद्योगविश्वाला मोठा लाभ होताना दिसेल. खेरीज न्हावा-शिवावरील ताण कमी होण्यास मदत होईल.

## कराटे प्रशिक्षक बडदे जपान पदवी परीक्षा उत्तीर्ण



समाचार/नगर-दि.४

शहरातील कराटे प्रशिक्षक अमित प्रताप बडदे यांनी कराटेची जपान डिग्री परीक्षा उत्तीर्ण केली आहे. जपानी मान्यता प्राप्त कराटे परीक्षा उत्तीर्ण होणारे ते पहिले नगरकर ठरले आहेत. जपान कराटे दो कैबुकाईच्या जपान डिग्री परीक्षा २७आणि २८ डिसेंबर २०२४ रोजी विद्याभवन शाळा, नेरूळ, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. जपान कराटे दो कैबुकाईचे अध्यक्ष हान्शी गेनकू सातो यांच्या मार्गदर्शनाखाली या परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. परीक्षेसाठी हरियाणा, उत्तर प्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश, गुजरात, महाराष्ट्र आदी राज्यांतील प्रशिक्षक आणि प्रतिनिधींनी सहभाग घेतला होता. जपान कराटे दो कैबुकाई इंडिया फेडरेशनचे डायरेक्टर व इंडिया प्रेसिंटेटिव्ह शिरीष किसन तळेकर यांनी अमित प्रताप बडदे यांचे अभिनंदन केले.

जपान कराटे दो कैबुकाई इंडिया फेडरेशनचे डायरेक्टर व इंडिया रेप्रेसेंटेटिव्ह  शिरीष किसन तळेकर यांनी  अमित प्रताप बडदे यांचे अभिनंदन करत त्यांच्या कामगिरीचे विशेष कौतुक केले. तसेच, जिल्ह्यातील पहिल्या अधिकृत सभासद आणि प्रतिनिधी म्हणून त्यांचा गौरव केला.

## सौरभ शिंदे याला कुस्तीत कांस्यपदक



समाचार/नगर-दि.४

पिंपळगाव वाघा (ता. नगर) येथील सौरभ पोपट शिंदे या मल्लाने अहिल्यानगर येथे नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत माती विभागात ७४ किलो वजन गटा मध्ये कास्यपदक पटकाविले. पै. शिंदे याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करुन नगर जिल्ह्यासाठी पदक मिळवून दिले.

सौरभ शिंदे सध्या गुरु हनुमान कुस्ती संकुल अंबिलवाडी येथे विकास सासवडे व सखाराम गव्हाणे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत आहे. या यशाबद्दल त्याचे नगर तालुका तालीम सेवा संघाचे अध्यक्ष नाना डोंगरे, सचिव बाळू भापकर, तुकाराम वाबळे, दत्ता नाट, गुलाब केदार, बबन शेळके, सुखदेव जाधव, उद्योजक अरुण फलके, गोकुळ जाधव, वस्ताद भानुदास ठोकळ, उपाध्यक्ष संदिप डोंगरे आदींनी अभिनंदन केले.

## संत एकनाथ

**संतगाथा**

**सर्वसाधारणपणे नाथ म्हणून ओळखले जाणारे संत एकनाथ (जन्म : पैठण, इ.स. १५३३; - इ.स. १५९९) हे महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातले एक संत होते. त्यांचा जन्म इ.स. १५३३ मध्ये पैठण येथे झाला. संत भानुदास हे एकनाथांचे पणजोबा. ते सूर्याची उपासना करीत. श्री संत एकनाथांच्या वडिलांचे नाव सूर्यनारायण होते. आईचे नाव रुक्मिणी होते.**

**परंतु एकनाथांच्या दुर्दैवानेच ते तान्हे मूल असताना त्यांचे आईवडील देवाघरी निघून गेले, तेव्हा त्यांचा सांभाळ त्यांचे आजोबा चक्रपाणी यांनी केला. चक्रपाणी यांचे वडील म्हणजेच एकनाथांचे पणजोबा संत भानुदास हे विठ्ठल भक्त होत. एकनाथ लहानपणापासून तल्लख बुद्धीचे होते.**

**आई-वडिलांचा सहवास त्यांना फार काळ लाभला नाही. एकनाथांचे पालनपोषण आजोबांनी केले. चक्रपाणी आणि सरस्वती हे त्यांचे आजोबा व आजी होत एकनाथांचे गुरू सद्गुरू जनार्दनस्वामी हे देवगड (देवगिरी) येथे या दरबारी अधिपती होते. हे मुळचे चाळीसगावचे रहिवासी; त्यांचे आडनाव देशपांडे होते. ते दत्तोपासक होते. गुरू म्हणून संत एकनाथांनी त्यांना मनोमन वरले होते. नाथांनी परिश्रम करून गुरूसेवा केली आणि साक्षात दत्तात्रेयांनी त्यांना दर्शन दिले; द्वारपाल म्हणून दत्तात्रेय नाथांच्या द्वारी उभे असत असे म्हणतात.**

**नाथांनी पैठणजवळच्या वैजापूर येथील एका मुलीशी विवाह केला. एकनाथ आणि गिरिजाबाई यांना गोदावरी व गंगा या दोन मुली व हरी नावाचा मुलगा झाला. त्यांचा हा मुलगा हरिपंडीत त्याने नाथांचे शिष्यत्व पत्करले. एकनाथांनी समाधी घेतल्यानंतर हरिपंडितांनी दरवर्षी नाथांच्या पादुका आषाढीवारीसाठी पंढरपुरास नेण्यास सुरुवात केली. हरीला प्रल्हाद, मेघश्याम व राघोबा अशी तीन अपत्ये झाली. पैकी केवळ मेघश्याम या मधल्या मुलाचा मूळ वंश सद्य स्थितीत पैठण येथे अस्तित्वात आहे. कवी मुक्तेश्वर हे नाथांचे मुलीकडून नातू होत.**

**संत ज्ञानेश्वरांच्या नंतर सुमारे २५० वर्षांनी एकनाथांचा जन्म झाला. 'बये दार उघड' असे म्हणत नाथांनी अभंगरचना, भारूड, जोगवा, गवळणी, गोंधळ यांच्या साहाय्याने जनजागृती केली. एकनाथ हे संतकवी, पंतकवी व तंतकवी होते. त्यांनी आपल्या साहित्याद्वारे जनतेचे रंजन व प्रबोधन केले. ते 'एका जनार्दन' म्हणून स्वतःचा उल्लेख करतात, एका जनार्दनी ही त्यांची नाममुद्रा आहे.**

**'एकनाथी भागवत' हा त्यांचा लोकप्रिय ग्रंथ आहे. ही एकादश स्कंदावरील टीका आहे. मुळात एकूण १३६७ श्लोक आहेत. परंतु त्यावर भाष्य म्हणून १८,८१० ओव्या संत एकनाथांनी लिहिल्या आहेत. व्यासांनी रचलेले मूळ भागवत १२ स्कंदांचे आहे. नाथांनी लिहिलेल्या भावार्थ रामायणाच्या सुमारे ४० हजार ओव्या आहेत. रुक्मिणीस्वयंवर हेही काव्य त्यांनींच लिहिले आहे. दत्ताची आरतीही (त्रिगुणात्मक त्रयमूर्ति दत्त हा जाण) त्यांची आरती गणपतीसमोर गायच्या आरत्यांपैकी एक आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे एकनाथांनी ज्ञानेश्वरीची प्रत शुद्ध केली. नाथ हे महावैष्णव होते. दत्तभक्त होते, देवीभक्त पण होते.**

**त्यांनी एकनाथी अभंगगाथा, चिरंजीवपद, रुक्मिणीस्वयंवर, शुकाष्टक, स्वात्मबोध आनंदलहरी, हस्तमालकटीका, चतु:श्लोकी भागवत, मुद्राविलास, लघुगीता, अनुभवानंद, ब्रिदावळी**

**संत एकनाथमहाराज कृत हरिपाठ - एकूण २५ अभंग**

**समाजाच्या जागृतीसाठी अभंग, गवळणी व भारुडे यांची रचना केली.**

**ज्ञानेश्वरीच्या उपलब्ध प्रतींचे शुद्धीकरण (ज्ञानेश्वरी लिहिल्यानंतर जवळजवळ २५० वर्षांनंतर) ज्ञानेश्वरीच्या शुद्धीकरणाचे काम त्यांनी शके १५०६ मध्ये पूर्ण केले.**

**संत ज्ञानेश्वरांच्या आळंदी येथील समाधिस्थळाचा शोध व ज्ञानेश्वरांच्या समाधीचं जिर्णोद्धार केला. तसेच त्याचा मूळ गाभारा बांधून काढला.**

**ज्ञानेश्वर महाराजांच्या मंदिरात नित्य पूजेची व्यवस्था लावून आळंदीची समाधी सोहळ्याची कार्तिकी यात्रा पुन्हा सुरू केली.**

**- शारदा अनंत होशिंग**
**समर्थ सत्संग परिवार**
**९४२०७४८७१८**




### राशीभविष्य

- **मेष** : भाग्य वृध्दींगत करणाऱ्या घटना घडतील. स्वमताग्रह टाळायला हवा. उष्णतेपासून त्रास होऊ शकेल.
- **वृषभ** : व्यवसायात अपेक्षित प्रगती होईल. शारीरिक तक्रारींची दखल घ्यावी. नव्या संधींचं स्वागत करावं.
- **मिथुन** : चिकाटीने कार्यात यश मिळेल. भागीदारी व्यवसायात मतभेद टाळा. कला-गुणांचा विकास होईल.
- **कर्क** : कौटुंबिक जीवनातील प्रश्न सामंजस्यानं सोडवावेत. पोटाच्या तक्रारी वाढणार आहेत. काळजी घ्या.
- **सिंह** : शिक्षणातून प्रगती साधता येईल. अचानक धनलाभाचे योग आहेत. अडचणींवर मात करता येईल.
- **कन्या** : विचारांना चालना मिळेल. सांसारिक जीवनात आनंद लाभेल. महत्त्वाचे व्यवहार मार्गी लागतील.
- **तूळ** : वयोवृध्दांनी दगदग टाळायला हवी. तुमचा जनसंपर्क वाढणार आहे. उपजत गुणांचा विकास होईल.
- **वृश्चिक** : आज थोरामोठ्यांचं मार्गदर्शन लाभेल. योजलेली कामं मनासारखी होतील. अडचणींची चिंता नको.
- **धनु** : आर्थिक गुंतवणूक विचारानं करावी. नव्या कामांना गती प्राप्त होईल. अपेक्षित प्रगती साधता येईल.
- **मकर** : रेंगाळलेली कामं मनासारखी होतील. आर्थिक नियोजन करता येईल. मित्रांचं चांगलं सहकार्य लाभेल.
- **कुंभ** : नवे विचार मार्गी लावता येतील. दैनंदिन कामात अधिक लक्ष घालावं. अडचणीतून मार्ग काढता येईल.
- **मीन** : दैनंदिन कामात अधिक लक्ष घालावं. गुंतवणूक विचारानं करावी. कौटुंबिक सौख्य उत्तम लाभेल.

### दिनविशेष

**५ फेब्रुवारी**

- **१९५२** : स्वतंत्र भारतातील पहिली निवडणूक पार पडली.
- **२००४** : अबू सालेमला भारताकडे सोपवण्याचा पोर्तुगालच्या कोर्टाचा आदेश.
- **२०१३** : विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत भारतीय महिला खेळाडू साखळीत गारद.
- **२०१४** : श्रीलंकेचा फलंदाज कुमार संगकाराने कारकिर्दीतील पहिले कसोटी त्रिशतक झळकावले.
- **२०१८** : बालरंगभूमीचा पाया रचणाऱ्या आणि बालरंगभूमीला सशक्त दृष्टिकोन देणाऱ्या सुधाताई करमरकर यांचे निधन.

### आरोग्यमंत्र

## जाणा स्वरयंत्राचा कर्करोग

अलिकडच्या काळात घशाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग या व्याधीचं प्रमाण वाढत असलं तरी स्वरयंत्राचा कर्करोगही विचारात घेण्याजोगा आहे. त्यामुळे या संदर्भातही पुरेशी माहिती असणं आवश्यक आहे. महत्त्वाची बाब म्हणजे या कर्करोगाची लक्षणं लवकर लक्षात येतात. आवाज घोगरा होणं, श्वास घ्यायला त्रास, खूप खोकला, कफातून रक्त पडणं, मान दुखणं, घसा खवखवणं, कान दुखणं, अन्न गिळताना त्रास होणं, मानेला सुज, वजन अचानक कमी होणं ही या विकाराची सर्वसाधारण लक्षणं मानली जातात. अर्थात ही कॅन्सरचीच लक्षणं असतात असं नाही. पण यापैकी काही लक्षणं एका आठवड्यापेक्षा जास्त काळ राहिली तर तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा.



धूम्रपानामुळे स्वरयंत्रातल्या पेशींना धोका पोहोचू शकतो. तसंच अतिप्रमाणात मद्यपान, आहारात पोषक घटकांचा अभाव, रोगप्रतिकारक्षमतेशी संबंधित समस्या, ह्यूमन पॅपिलोमा विषाणूंच्या संपर्कात येणं, कामाच्या ठिकाणी विषारी घटकांशी संपर्क, काही जनुकीय विकार ही याची कारणं आहेत. जास्त धूम्रपान, तंबाखूचं सेवन, आहारात फळं-भाज्यांचा समावेश न करणारे, प्रक्रिया केलेल्या पदार्थांचं जास्त सेवन करणारे, अतिरिक्त मद्यपान करणारे तसंच घरात घशाच्या कॅन्सरचा इतिहास असणाऱ्यांना स्वरयंत्राच्या कर्करोगाचा धोका असतो. या विकाराची लक्षणं दिसल्यावर विविध चाचण्यांचा सल्ला दिला जातो. लॅरिंगोस्कोपी चाचणीत घशात काही अनियमितता आढळली तर बायोप्सी केली जाते. सीटी किंवा एमआरआय स्कॅन करून कॅन्सर किती पसरला, ते पाहिलं जातं.

### महत्त्वपूर्ण काही...

## प्रदूषणवाढीचा सामना

आजकाल प्रदुषणात सातत्यानं होत असलेली वाढ ही मोठी गंभीर समस्या ठरत आहे. प्रदूषणाचे विविध दुष्परिणाम समोर येत आहेत. विशेषत: प्रदूषणाचा मानवी आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहे. राजधानी दिल्लीमध्ये तर अलिकडे हवेतील प्रदूषणानं उत्युच्च पातळी गाठली होती. ही पातळी कमी करण्यासाठी तातडीने काही उपाययोजना करण्यात आल्या. तरिही दिल्लीतील प्रदूषणाच्या समस्येला अजून म्हणाव्या त्या प्रमाणात आळा घालता आलेला नाही. खरं तर प्रदूषणामुळे प्रौढ महिलांना डिमेंशिया, अल्झायमर यासारख्या व्याधींची शक्यता असते. अधिक प्रदूषण असणाऱ्या भागात राहणाऱ्या महिलांना हृदयविकाराचा धोका जास्त असतो. कारखाने, औद्योगिक आस्थापना, यंत्रप्रणाली असणाऱ्या भागांमध्ये प्रदुषणाची पातळी ८१ टक्क्यांपर्यंत पोहोचते. या भागात राहणाऱ्या ९२ टक्के महिला आरोग्यविषयक समस्यांनी पीडित असतात. प्रदूषित कण मेंदूपर्यंत पोहोचून या यंत्रणेवर दुष्परिणाम करतात. सामान्य लोकांपेक्षा प्रौढ महिलांना हा धोका २१ टक्के जास्त असतो. हा धोका लक्षात घेता काळजी घ्यावी.

### सल्ला मोलाचा

## संस्कार

त्या दिवशी ऑफिसमधून बाहेर पडण्यास उशीर झाल्यानं घाईघाईनं घराकडे निघाले होते. बस वेळेत मिळाली आणि फारसं ट्रॅफिक जाम नसल्यानं तशी वेळेत पोहोचली. बसमधून उतरून घाईघाईनं निघाले. सारं लक्ष घराकडे लागलं होतं. मुलं शाळेतून वेळेत आली असतील का, अभ्यास करत असतील का, घरात पसारा झाला असेल का, असे प्रश्न मनात होते. त्या विचारात लिफ्टजवळ आले तर ती बंद. मग जिन्याने जाणं भाग पडलं. जिना चढू लागले आणि दुसऱ्या मजल्याजवळ येताच कोणी शुभंकरोती म्हणत असल्याचा आवाज आला. नकळत पावलं थबकली. खरं तर त्या फ्लॅटमध्ये एक कुटुंब नव्यानंच रहायला आलं होतं. त्यामुळे फार परिचय नव्हता. घराचं दार उघडं होतं. समोरच्या हॉलमध्ये वयस्कर स्त्री दोन लहान मुलांसह रामरक्षा म्हणत होती. माझं मन भूतकाळात गेलं. माझं लहानपण आठवलं आणि त्या संस्कारांचं महत्त्वही लक्षात आलं. 'अगं आई इथं का उभी आहेस? चल लवकर' मुलाच्या हाक मारण्यानं मी भानावर आले आणि पावलं घराच्या दिशेनं वळली.

### पंचांग

**बुधवार, ५ फेब्रुवारी २०२५**
विक्रम संवत्सर, शके १९४६,
माघ शु. ८, नक्षत्र : भरणी
चंद्रराशी : मेष, शुक्ल योग,
सूर्योदय : ७.११, सूर्यास्त : ६.३३

### फॉरवर्डस

गुलाब स्वत: काट्यांसमवेत राहून प्रेमाचा संदेश देत असतो.

**उस गुलाब से पूछो की दर्द क्या होता है,**
**देता है पैगाम प्यार के पर खुद कांटों की चुभन में रहता है**


### वाचा तर खरं

✻ लोकरीचे कपडे मशीनमध्ये धुतले तर खराब होऊशकतात. तेव्हा हे कपडे हाताने धुवा. ✻ 'मशीन वॉशेबल' लेबल असलेले कपडे मशीनध्ये धुतले तरी चालतात. हे कपडे धुण्यासाठी स्वच्छ आणि कोमट पाण्याचा वापर करा. लोकरीचे कपडे धुण्यासाठी खास पावडर किंवा केमिकल्सविरहित साबण किंवा पावडर वापरा. कपडे १० मिनिटे कोमट पाण्यात भिजवून ठेवा. त्यानंतर पुन्हा कोमट पाण्यातून काढा. शेवटी थंड पाण्याचा वापर करा. ✻ लोकरीचे कपडे उलट्या बाजूने धुवा. यामुळे कपड्यांचा दर्शनी भाग नव्यासारखा दिसेल.

### भटकंती

## निसर्गसौंदर्याची खाण

दोस्तांनो, भटकंतीसाठी केरळप्रमाणे तमिळनाडूचाही आवर्जून विचार करता येण्यासारखा आहे. याचं मुख्य कारण तमिळनाडूमध्ये भटकंतीसाठी बरीच सुंदर ठिकाणं आहेत. इथलं निसर्गसौंदर्य आपल्याला आकर्षित करतं. या राज्यातली काही ठिकाणं परिचित आहेत तर काही अपरिचित. असंच एक ठिकाण म्हणजे तेनी. पश्चिम घाताल्या पर्वतरांगांमध्ये वसलेलं तेनी म्हणजे निसर्गसौंदर्याची खाण आहे. तेनीवर निसर्गाने वरदहस्त ठेवला, असंच म्हणावं लागेल.



समुद्रसपाटीपासून १५०० मीटर उंचीवरचं हे ठिकाण अनेक अर्थांनी अनोखं आहे. इथलं दृश्य बघून पर्यटक हरखून जातात. हा भाग हिरवाईने नटलेला आहे. म्हणूनच याला तामिळ भाषेत 'पच्चा कुमानी' म्हणजे 'हरित शिखर' असं म्हटलं जातं. काही वर्षांपूर्वीपर्यंत तेनीमध्ये खासगी चहा आणि कॉफीच्या मळेवाल्यांचं राज्य होतं. सर्वसामान्यांना तिथे प्रवेश दिला जात नसे. पण पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने तेनी सर्वसामान्यांसाठी खुलं केलं. तेनीमध्ये डोंगर पोखरून गुहांची निर्मिती करण्यात आली आहे. या प्राचीन गुहा तेनीचं आकर्षण आहे. इथे कैलास मंदिरही आहे. इथलं गौरी अम्मा मंदिरही खूप प्रसिद्ध आहे. तेनी परिसरात विविध जातींचे पक्षी बघायला मिळतात. तेनीपासून ३० किलोमीटर अंतरावर असणाऱ्या कुरंगनी टॉपवर ट्रेकिंग करता येतं.

### खेचाखेची

## चोरी

**पत्नी** : (घाईघाईने) अहो, ऐकलं का? आजकाल मला आपल्या राजूचं लक्षण काही ठीक दिसत नाही. तो घरातच पैशाची चोरी करु लागला आहे. मी कुठेही लपवून ठेवले तरी तो पैसे शोधून काढतो आणि लंपास करतो.

.

**पती** : (विचार करत) एक काम कर... घरातले पैसे त्याच्या पुस्तकात लपवून ठेव. परीक्षेपर्यंत ते शोधू शकणार नाही.

### वेगळे काही

काही स्थळं इतकी देखणी असतात की कोणीही त्याकडे आकर्षित व्हावं. ॲरिझोनामधील कोलोरेडो नदीही अशीच पाहताक्षणी आकर्षित करणारी. या भागाला 'घोड्याचा नाल' म्हणून ओळखलं जातं. घोड्याच्या नालाच्या आकाराशी साधर्म्य असल्यानं या परिसराला हे नाव पडलं आहे. हे अप्रतीम दृष्य टिपण्यासाठी अनेक फोटोग्राफर्सची वर्दळ असते. सगळा परिसर एका शॉटमध्ये टिपणं अत्यंत कौशल्याचं काम आहे. पण एका कुशल छायाचित्रकारानं हे काम नेमकं साधलंय. अर्थातच यासाठी त्यानं कमालीची जोखीम पत्करली. एका अत्यंत धोकादायक खडकावर उभं राहून त्यानं हा सुंदर स्नॅप मिळवला आहे.

### रूचिरा

## फरसाणची रूचकर भाजी

घरच्या घरी भेळ करायची असेल किंवा पोहे, उपमा करायचा असेल तर त्यावर फरसाणचा वापर आवर्जून केला जातो. शिवाय चिवड्यात तर फरसाण हवंच. नाही का? पण फरसाण जास्त दिवस शिल्लक ठेवल्यानं वाया जाण्याची वा खराब होण्याची शक्यता असते. त्यासाठी शिल्लक फरसाणच्या भाजीचा पर्याय विचारात घेता येईल. चला तर मग. आज याच भाजीची माहिती घेऊ...



**सामग्री** : दोन वाट्या फरसाण, चिरलेले दोन टोमॅटो, चिरलेले दोन कांदे, तिखट, तेल, जिरे, चवीप्रमाणे मीठ आणि साखर, चिरलेली कोथिंबीर इत्यादी.

**कृती** : सर्वप्रथम फरसाण हाताने चुरुन घ्या. कढई चांगली तापल्यानंतर तेल टाकून त्यात जिरे तडतडून घ्या. त्यात बारीक चिरलेला कांदा गुलाबी रंगावर परतून घ्या. नंतर चिरलेला टोमॅटो घालून पुन्हा थोडा वेळ परतून घ्या. यावेळी तिखट, मीठ आणि साखरही घाला. हा मसाला तेल सोडू लागला की त्यात फरसाण घालून मिश्रण एकसारखं करा. भाजी फार कोरडी वाटत असेल तर पाण्याचा शिपका मारावा. कढईवर झाकण ठेवून चांगली वाफ येऊ द्या. आता ही तयार भाजी डिशमध्ये काढून कोथिंबीर, लिंबाच्या फोडीने सजवा. गरमागरम फुलके अथवा पोळीबरोबर सर्व्ह करा.

Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahilyanagar (Ahmednagar) (M Corp), Dist.Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahilyanagar (M Corp), Dist Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code- 414 001, Maharashtra.
Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहिल्यानगर (अहमदनगर) (एम कॉर्प), जिल्हा-अहिल्यानगर (अहमदनगर), पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा- अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले.
संपादक- स्वाती महेंद्र कुलकर्णी. दूरध्वनी- २३४५२७०, २३४७०८६, मो.- ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

## अर्ज़ किया है...

*खींचो न कमानों को न तलवार निकालो*
*जब तोप मुक़ाबिल हो तो अख़बार निकालो*
**- अकबर इलाहाबादी**

कमान - धनुष्य ; मुक़ाबिल - प्रतिद्वंद्वी; अख़बार - वर्तमानपत्र

वर्तमानपत्राला लोकशाहीचा चौथा स्तंभ मानला जातो. वर्तमानपत्रात किती ताकद असू शकते हे अधोरेखीत करणारा हा शेर आहे. शायर म्हणतात, धनुष्याची किंवा तलवारीची गरज नाहीये. तोफेसारखा बलवान कोणी प्रतिद्वंद्वी समोर असेल तर त्याच्या समाचारासाठी वर्तमानपत्र पुरेसे आहे.



# समाचार

मंगळवार दि. ४ फेब्रुवारी २०२५ पान ३


## जिल्हा फुटबॉल लीग स्पर्धा; दहा संघाचा सहभाग

# कराळे क्लब हाऊस संघाला विजेतेपद

**समाचार/नगर-दि.४**

अहिल्यानगर जिल्हा फुटबॉल लीग स्पर्धा २०२४-२५ मोठ्या उत्साहात यशस्वीरित्या पार पडली. अहमदनगर महाविद्यालयाच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत सीनियर डिव्हिजन मधील १० संघानी सहभाग नोंदवला. स्पर्धेतील ४५ सामने हे लीग पद्धतीने (ऑल प्ले ऑल) खेळवण्यात आले. यामध्ये १५० गोल नोंदवले गेले. कराळे क्लब हाऊस संघाने विजेतेपद तर सुमन इंटरप्राईजेस फुटबॉल क्लबने उपविजेतेपद पटकाविले. विजेत्या संघात चषक २१ हजार रुपये रोख व उपविजेत्या संघास चषक १५ हजार रुपये रोख पारितोषिक देण्यात आले.



जिल्हा फुटबॉल संघटनेचे सचिव रोनप फर्नांडिस म्हणाले की, या स्पर्धेत २०० हून अधिक युवा फुटबॉल खेळाडूंनी आपल्या कौशल्याचे आणि स्पर्धात्मकतेचे प्रदर्शन केले. हे संपूर्ण वर्ष फुटबॉलसाठी अत्यंत उत्सावर्धक ठरणार आहे. जिल्ह्यात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. आगामी काळात बी.पी. हिवाळे करंडक यामध्ये शहरातील सर्वोत्तम ६ आणि राज्यभरातील १० संघ अशा १६ संघांचा सहभाग असणार आहे. अलेक्स करंडक आणि एस.के. करंडक यांसारख्या प्रतिष्ठित स्पर्धा नियोजित करण्यात आले असल्याची माहिती दिली. तसेच नुकतेच झालेल्या या स्पर्धेसाठी जिल्हा फुटबॉल संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया आणि वरिष्ठ उपाध्यक्ष मनोज वाळवेकर यांचे अमूल्य पाठबळ आणि सहकार्याबद्दल त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले. ही स्पर्धा जिल्ह्यातील फुटबॉल खेळाला चालना देण्यासाठी एक मैलाचा दगड दगड ठरली आहे. पुढील काळात अजून मोठ्या स्पर्धा आयोजित करून फुटबॉलचा प्रसार करण्याचा जिल्हा फुटबॉल संघटनेने मानस व्यक्त केला आहे.

स्पर्धेचा निकाल-विजयी- कराले क्लब हाऊस, उपविजयी- सुमन इंटरप्राईजेस फुटबॉल क्लब, अनुक्रमे फिरोदिया शिवाजीयन्स फुटबॉल क्लब, फ्रेंड्स स्पोर्ट्स अॅकॅडमी, फिरोदिया शिवाजीयन्स अॅकॅडमी, सिटी क्लब, गुलमोहर स्पोर्ट्स क्लब, डॉ. बाबासाहेब आंबेडकर फुटबॉल क्लब, जहारवीर फुटबॉल क्लब, नमोह फुटबॉल क्लब यांनी क्रमांक पटकाविले.

वैयक्तिक पारितोषिके- सर्वोत्कृष्ट गोल रक्षक- यश कोठाळे (कराळे क्लब हाऊस), सर्वोत्कृष्ट खेळाडू- प्रकाश कनोजिया (सुमन इंटरप्राईजेस फुटबॉल क्लब), सर्वोत्कृष्ट उद्योन्मुख खेळाडू- शुभंकर सावंत (गुलमोहर स्पोर्ट्स क्लब).

# शासकीय चित्रकला परीक्षेत सांगळेगल्लीतील समर्थ शाळेचा विक्रम



**समाचार/नगर-दि.४**

महाराष्ट्र शासनाच्या कला संचालनालयातर्फे घेण्यात आलेल्या ग्रेड चित्रकला परीक्षेत समर्थ शाळेचा सांगळे गल्ली विभागाने विक्रम केला असून या परीक्षेत शाळेने १०० टक्के निकालाची परंपरा याही वर्षी कायम ठेवली आहे.

यावर्षी घेण्यात आलेल्या शासकीय एलिमेंटरी व इंटरमिजिएट चित्रकला ग्रेड परीक्षेत शाळेतील ५४ विद्यार्थ्यांनी ए ग्रेड, ४८ विद्यार्थ्यांनी बी ' ग्रेड व ३६ विद्यार्थ्यांनी सी ' ग्रेड प्राप्त केली. या सर्व विद्यार्थ्यांना कला शिक्षक संदीप गायकवाड, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका वसुधा जोशी व प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक अजय महाजन यांचे मार्गदर्शन लाभले.या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष भा. ल. जोशी, उपाध्यक्ष दीपक ओहोळ, संस्थेचे व्हा. चेअरमन व शालेय समिती चेअरमन श्रीपाद कुलकर्णी, सचिव प्र. स. ओहोळ व सुरेश क्षीरसागर यांनी सर्व विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले आहे. संस्थेचे शाळेचे मुख्याध्यापक अजय महाजन यांच्या संकल्पनेतून शाळेत विविध प्रकारच्या कार्यशाळा आयोजित केल्या जातात तसेच विविध स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी होण्यासाठी त्यांचे प्रोत्साहन लाभते त्यामुळे विद्यार्थ्यांना हे घवघवीत यश मिळाले याबद्दल त्यांचे खजिनदार संजय कुलकर्णी, संस्थेचे सदस्य व शालेय समिती चेअरमन स्वप्निल कुलकर्णी, संस्थेचे सदस्य अॅड. किशोर देशपांडे, संध्या कुलकर्णी, विकास सोनटक्के,ड. वेद देशपांडे, सुनिल जोशी, इंजि.सचिन क्षीरसागर, स्वप्निल सोनटक्के यांनी विशेष कौतुक केले आहे.

# सूर्यभान लांडगे यांचे निधन

**समाचार/नगर-दि.४**



पिंपळगाव लांडगा (ता. नगर) येथील ज्येष्ठ समाजिक कार्यकर्ते व प्रगतीशील शेतकरी सूर्यभान सावळेराम लांडगे (वय ८४) यांचे मंगळवारी (दि. ४) वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक विवाहित मुलगी, सूना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. अहमदनगर प्रेस क्लबचे अध्यक्ष व लोकआवाजचे मालक-संपादक विठ्ठलराव लांडगे, जिल्हा ऑडिटर संघटनेचे अध्यक्ष पांडुरंग लांडगे यांचे वडील तसेच अहिल्यानगर इलेक्ट्रीकल डिलर्स असोशिएशनचे अध्यक्ष बाळासाहेब परभणे यांचे ते सासरे होत. पिंपळगाव लांडगा आणि परिसरात सूर्यभान लांडगे यांचा समाजिक आणि धार्मिक कामात सहभाग होता. अनेक वर्षे त्यांनी पंढरपूर वारी दर्शन नियोजनात सक्रिय सहभाग घेतला. सुरवातीच्या काळात प्रतीकुल परिस्थितीशी संघर्ष करत त्यांनी यशस्वी कुटूंब घडवले. त्यांच्या जाण्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्यावर नगर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध क्षेत्रातील नागरिक, प्रतिष्ठित लोक उपस्थित होते.


### पान १ वरुन


## अन् ठाकरेसेनेला खिंडार पडले!

ठाकरे सेनेचे काही विद्यमान आमदार खासदारही शिंदेसेनेचे धनुष्यबाण हाती घेणार असल्याची चर्चा होते आहे. या परिस्थितीत नगर शहरातील ठाकरे सेनेच्या १२ नगरसेवकांसह आजी माजी पदाधिकारी अशा जवळपास ४० प्रमुख पदाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करून ठाकरे सेनेला मोठा धक्का दिला. ठाकरे सेनेचे उर्वरित नगरसेवक आणि काही प्रमुख पदाधिकारीही पक्षातच रहावे ही शिंदे सेनेत जावे, या द्विधा मनःस्थितीत आहेत. त्यामुळे नजीकच्या काळात ठाकरे सेनेला आणखी धक्के बसण्याची शक्यता नाकारली जात नाही. दहा वर्षापूर्वी शिवसेनेचा भक्कम बालेकिल्ला असलेल्या नगर शहरात ठाकरे सेनेवर ही परिस्थिती का ओढावली, याची चर्चाही शिवसैनिकांमध्ये होते आहे. १९९० ते २००९ दरम्यान विधानसभेच्या ५ निवडणुकीत नगर शहरात शिवसेनेचे वर्चस्व कायम राहिले. सलग पाचवेळा निवडून येत स्व. अनिल राठोड यांनी शहरात इतिहास घडविला. १९९५ मध्ये राज्यात शिवसेना-भाजपा युतीचे सरकार सत्तेवर आल्यानंतर स्व. राठोड यांना अन्न व नागरी पुरवठा खात्याचे राज्यमंत्री म्हणून काम करण्याची संधीही मिळाली. स्व. राठोड यांनी सोबतच्या एकनिष्ठ सहकारी, शिवसैनिकांच्या मदतीने शहरात शिवसेना रुजविली, वाढविली. नगरला महापालिका स्थापन झाल्यानंतर शहराचा पहिला महापौर शिवसेनेचाच झाला. नंतरच्या कालावधीतही शहरात शिवसेनेचे महापौर झाले. महापालिकेत सत्ता आली. विधानसभेच्या दोन निवडणुकीत राष्ट्रवादीकडून पराभव झाला तरी शिवसेनेची ताकद शहरात राहिली. शिवसेनेच्या फुटीनंतर ती विभागली गेली, मात्र बहुतांश एकनिष्ठ पदाधिकारी, शिवसैनिक ठाकरे सेनेवरोबरच ठामपणे उभे राहिले. काँग्रेस-राष्ट्रवादी-शिवसेनेची महविकास आघाडी असताना लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादीचे उमेदवार खा. निलेश लंके यांच्या विजयासाठी ठाकरे सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी मोठे परिश्रम घेतले. त्यामुळे विधानसभेला आघाडीचे मनोबल वाढले. नगर शहर हा शिवसेनेचा जुना बालेकिल्ला असल्याने ठाकरे सेनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी शहरातून निवडणुकीची तयारी सुरू केली. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेऊन शहराची जागा पक्षाकडे घेण्याची मागणी केली. तेथे सकारात्मक चर्चा झाल्याने इच्छुकांनी निवडणुकीची मोर्चेबांधणी चालविली. ठाकरे सेनेचे दक्षिण जिल्हाप्रमुख प्रा. शशिकांत गाडे, शहरप्रमुख संभाजी कदम, माजी महापौर भगवान फुलसौदर, ज्येष्ठ नगरसेवक बाळासाहेब बोराटे, युवा सेनेचे विक्रम राठोड आदि सर्वच प्रमुख उमेदवारीसाठी इच्छुक होते. आमच्यापैकी कुणालाही उमेदवारी द्या, आम्ही त्यास निवडून आणू, असेही पक्षश्रेष्ठींना सांगितले गेले. मात्र आघाडीत जागावाटपाची चर्चा करणाऱ्या ठाकरे सेनेच्या नेत्यांनी आघाडीत नगर शहराऐवजी श्रीगोंदा मतदारसंघाला पसंती दिली. विधानसभेला आघाडीत राष्ट्रवादीला श्रीगोंदा मतदारसंघ हवा होता. त्यासाठी नगर शहर मतदारसंघ ठाकरे सेनेला देण्याची तयारीही दर्शविली होती, असेही त्यावेळी सांगितले गेले. मात्र ठाकरे सेनेच्या श्रेष्ठींनी आघाडीत श्रीगोंदा मतदारसंघ आम्हालाच पाहिजे, अशी आग्रही भूमिका घेत तेथे पक्षाची उमेदवारीही जाहीर केली. पर्यायाने शिवसेनेला नगरची जागा मिळाली नाही आणि पक्षाचे शहरातील सर्वच इच्छुक कमालीचे दुखावले. त्यामुळे शहरात आघाडी उमेदवाराच्या प्रचारात ठाकरे सेनेचा अपेक्षित प्रतिसाद दिसला नाही. या निवडणुकीनंतरही ठाकरे सेनेच्या श्रेष्ठींनी नगर शहरातील पक्षाचे निष्ठावान पदाधिकारी, शिवसैनिकांशी संपर्क करून त्यांची नाराजी दूर करण्याचा, त्यांची समजूत घालण्याचा कुठलाही प्रयत्न केला नाही. त्यामुळे ठाकरे सेनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या नाराजीत आणखी भर पडली. त्यातूनच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या स्थानिक नेत्यांनी त्यांच्याशी सतत संपर्क करीत त्यांना आपलेसे केले आणि ठाकरे सेनेच्या शहरातील ४० प्रमुख पदाधिकाऱ्यांचा शिंदेसेनेत प्रवेश झाला. दक्षिण जिल्हाप्रमुख प्रा. शशिकांत गाडे, माजी महापौर भगवान फुलसौंदर नगरसेवक योगीराज गाडे, माजी मंत्री स्व. अनिल राठोड यांचे चिरंजीव, युवा सेनेचे विक्रम राठोड आदि काही मोजके प्रमुख पदाधिकारी ठाकरेसेनेत राहिले आहेत. त्यातील काही जणांचे अजून तळ्यात-मळ्यात चालू आहे. भविष्यात त्यांचाही शिंदेसेनेत जाण्याचा निर्णय झाला तर आश्चर्य वाटू नये. शिंदेसेना राज्यात आणि केंद्रातही सत्तेत सहभागी आहे. याखेरीज शहर विकासाच्यादृष्टीने महत्त्वाचे असलेले नगरविकास खाते उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे आहे. आगामी काळात महापालिकेच्या निवडणुका होऊ घातल्या आहेत. या सर्व पार्श्वभूमीवर ठाकरे सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी शिंदेसेनेची वाट धरली असल्याची चर्चा होते आहे. अर्थात पक्षश्रेष्ठींवरील नाराजीचे मुख्य कारण त्यामागे आहेच.

## आनंद योग केंद्रात रंगला हळदी कुंकू कार्यक्रम

# डॉ. कासवा यांनी दिला सुदृढ आरोग्याचा संदेश



**समाचार/नगर-दि.४**

महिलांना निरोगी आरोग्यासाठी योग-प्राणायामचे वाण देवून सावेडी येथील आनंद योग केंद्रात हळदी कुंकू कार्यक्रम उत्साहात पार पडला. वर्षभर निरोगी आरोग्याची चळवळ चालविणाऱ्या आनंद योग केंद्राच्या हळदी-कुंकू कार्यक्रमात परिसरातील महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

डॉ. पूजा कासवा थायरॉईड, मेनोपॉज, ऑस्टिपोलीसिस या आजारांवर मार्गदर्शन करताना म्हणाल्या की, टी ३ ,टी, हार्मोन्स असंतुलित झाले की थायरॉईड होतो. भारतात चार कोटी पेक्षा जास्त लोकांना थायरॉईड आहे. हायपो थायरॉईड मध्ये मेटाबॉलीजम कमी होऊन वजन वाढते. हायपर थायरॉईड मध्ये मेटाबॉलीजम वाढून वजन कमी होते. थायरॉईड ग्रंथी शरीराची मॅनेजर असून, ते चांगले राहण्यासाठी नारळ, नारळाचे तेल, अक्रोड, दूध, दही, पनीर, तूप खावे. सोयाबीन, पत्ताकोबी, फुलकोबी खाणे टाळण्याचे त्यांनी आवाहन केले. ऑस्टियोपोरोसिस मध्ये वय वाढल्याने हाडांची झीज होऊन हाडे ठिसूळ होतात. शरीराला दररोज १ हजार मिलीग्रॅम कॅल्शियमची गरज असते. शंभरग्रॅम नाचणी मध्ये ३०० ग्रॅम कॅल्शियम मिळते. कॅल्शियम शरीरात शोषणासाठी डी व्हिटॅमिनची आवश्यतकता असते. दररोज १५ ते २० मिनिटे सूर्य प्रकाश घ्यावा. यावेळी सादर करण्यात आलेल्या योगा डान्सचा आनंद उपस्थित महिलांनी घेतला. अलका कटारीया यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. अपेक्षा संकलेचा यांनी महिलांसाठी मनोरंजनात्मक व बौद्धिक स्पर्धा घेतल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उषा पवार, सोनाली जाधववार, पूजा ठमके, प्रतिक्षा गीते, रेखा हाडोळे, स्वाती वाळुंजकर, संगीता जाधव यांनी परिश्रम घेतले.



# समाजसेवक अविनाश देडगांवकर यांचा प्रेमदान चौक मित्र मंडळातर्फे सन्मान

**समाचार/नगर-दि.४**

प्रेमदान चौकात एका वाहन चालकाची दुसऱ्या वाहन चालकाच्या वाहनाला धडक झाल्याने बाचाबाची, भांडण सुरु असताना दोघांची समजूत काढली आणि त्यामुळे होणारा अनर्थ टळला. समाजसेवक अविनाश देडगांवकर हे गेली ४० वर्षांपासून नि:स्वार्थपणे उत्कृष्ट समाजसेवा करत आहेत. याच भावनेने प्रेमदान चौकातील दोन्ही वाहन चालकांचे भांडण मिटवल्याबद्दल प्रेमदान चौक मित्र मंडळातर्फे महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे डॉ. अण्णासाहेब नवले यांच्या हस्ते देडगांवकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी दत्तात्रय वडवणीकर, अनिल पन्हाळे, सुरेश चाबुकस्वार, विठ्ठल सुरम, किसनराव यंगुलदास, चंद्रकांत तेलंगुर आदी उपस्थित होते.

## सर्वेक्षण पूर्ण, निविदा प्रक्रिया सुरू

# पारनेरचा सिंचनाचा प्रश्न सुटण्याचा मार्ग मोकळा- आ. दाते

**समाचार/पारनेर-दि.४**

पारनेरचा सिंचनाचा पाणी प्रश्न सुटण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.सह्याद्रीच्या डोंगररांगेतील पश्चिम घाटावरून कोकणात

वाहून जाणारे पाणी पूर्वे कडे वळवण्यासाठी उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पाचे सर्व्हेक्षण पूर्ण झाले आहे.या प्रकल्पाची निविदा प्रक्रिया सुरू आहे. अशी माहिती आमदार काशिनाथ दाते यांनी पारनेर तालुक्यातील पाबळ येथे बोलताना दिली. पाबळ ग्रामस्थांच्या वतीने आमदार दाते यांचा सपत्नीक सत्कार व वहीतुला करण्यात आली यावेळी ते बोलत होते.गरजू विद्यार्थ्यांना वहीतुलेतील वह्यांचे वाटप करण्यात आले.माजी सभापती मधुकर उचाळे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. अशोक सावंत, विश्वनाथ कोरडे, प्रशांत गायकवाड,वसंत चेडे,प्रभाकर कवाद,आर.एस. कापसे,विक्रम कळमकर,दिलीप दाते,सचिन वराळ, राजेंद्र औटी उपस्थितीत होते.




माजी खा.बाळासाहेब विखे यांनी पारनेर तालुक्याच्या दुष्काळी भागाला पाटपाणी देण्याचे स्वप्न पाहिले. उपमुख्यमंत्री अजित पवार तालुक्याच्या पठार भागाला कुकडी प्रकल्पाचे पाणी मिळावे यासाठी आग्रही आहेत. जलसंपदामंत्रीपद राधाकृष्ण विखे यांच्याकडे आहे.दिल्लीपासून तालुक्यापर्यंत एकाच विचारांचे सरकार आहे.त्यामुळे तालुक्याचा पाणी प्रश्न मार्गी लागण्यात कोणतीही अडचण राहिलेली नाही असे आ.दाते म्हणाले. गेल्या तीस,चाळीस वर्षांत झालेल्या सर्व निवडणुका पाणी प्रश्नावर लढवल्या गेल्या.मात्र निवडून आल्यावर कोणीही या प्रश्नाला हात घातला नाही अशी खंत व्यक्त करतानाच आपण पाणी प्रश्न सोडवण्यासाठी प्राधान्याने काम सुरू केले आहे.आतापर्यंत आपल्या सिंचनासंदर्भात उपमुख्यमंत्री पवार, जलसंपदामंत्री विखे, संबंधित विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत तीन ते चार बैठका झाल्या.परिणामी पूर्वेकडे पाणी वळवण्याच्या प्रकल्पाचे सर्व्हेक्षण झाले असल्याचे दाते यांनी स्पष्ट केले.


**समाचार**

**वाचकांना नम्र सूचना**

**समाचार** वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


## मुंबई शेअर भाव

**प्रेसिडेंट ट्रम्पची टेरिफबद्दल शिथिलता उत्स्फूर्त खरेदी १२०० अंकांनी वाढ**

(शेअर सबब्रोकर)
अशोक पटवा
फोन-२४५२५२७, २४५२२६४
मोबा. ८७८८६९९९६१

**दिनांक ४-०१-२०२५ दुपारी २ पर्यंतचे भाव**


| | |
|---|---|
| आजचा इंडेक्स : | ७८२९० |
| एसीसी | २०२८-२९ |
| एशियन पेंट | २३३६-३७ |
| बजाज ऑटो लि. | ८९८४-८५ |
| बलराम फूड चिनी | ४६३-६४ |
| भारत फोर्ज | ११६४-६५ |
| क्रॉम्प्टन | ३५८-५९ |
| डीएलएफ | ७६३-६४ |
| डॉ. रेड्डीज् लॅब | ११२७-२८ |
| ग्रॅफाईट इंडिया | ४८३-८४ |
| हिंदुस्थान युनिलिव्हर | २४३८-३९ |
| आयटीसी लि. | ४५४-५५ |
| एल ॲण्ड टी लि. | ३४२९-३० |
| रिलायन्स इंड. | १२७८-७९ |
| एसबीआय | ७७७-७८ |
| टाटा मोटर्स | ७०६-०७ |
| टाटा स्टील | १३३-३४ |
| टीसीएस | ४१०३-०४ |
| लक्ष्मी ऑरगॅनिक | २१७-१८ |
| सुवेन फार्मा | ११९८-१९ |

# भविष्यात रोजगार निर्मितीला गती मिळेल- देशमुख

केंद्रीय अर्थसंकल्पात कौशल्य विकास कार्यक्रमावर विशेष भर दिल्यामुळे आगामी काळात रोजगार निर्मितीला मोठी गती मिळेल, असा विश्वास जिल्हा कौशल्य विकास समितीचे सदस्य श्री. विनायकराव देशमुख यांनी व्यक्त केला. केंद्रीय अर्थसंकल्पातील तरतुदींबाबत बोलताना श्री. देशमुख म्हणाले, यावर्षीचा अर्थसंकल्प एकंदरीतच सर्वसामान्यांना आणि मध्यमवर्गीयांना सुखावणारा आहे. त्यांच्यासाठी अनेक सवलतींचा वर्षाव या अर्थसंकल्पात करण्यात आलेला आहे. मात्र त्यापेक्षाही दीर्घकालीन परिणाम करणाऱ्या आणि बेरोजगारी निर्मूलनासाठी उपयुक्त ठरणाऱ्या कौशल्य विकास कार्यक्रमावर विशेष भर दिला गेला आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात देशभरातील मोठ्या कंपन्यांमध्ये एक कोटी युवकांना प्रशिक्षण देण्याची योजना पुढील पाच वर्षात राबविण्याचा केलेला निर्धार ही बेरोजगार युवकांसाठी अत्यंत दिलासा देणारा आहे. यासाठी केंद्र सरकारने दोन लाख कोटी रुपयांची केलेली तरतूद स्वागतार्ह आहे. याशिवाय आगामी पाच वर्षाच्या काळात वीस लाख



तरुणांना कुशल बनविण्यासाठी १००० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्याचा संकल्प तरुणांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. तसेच देशभरातील ५० लाख तरुणांना बेरोजगार भत्ता देऊन बेरोजगारी कमी करण्याचा प्रयत्न देखील स्वागतार्ह आहे. याबाबत अधिक माहिती देताना श्री. देशमुख म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी निवडणूक जाहीरनाम्यातच कौशल्य विकास कार्यक्रमाबाबत मोठे प्राधान्य दिले होते. आगामी काळात देशाला विश्वगुरू बनविण्याच्या दृष्टीने कुशल मनुष्यबळ असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे या अर्थसंकल्पात कौशल्य विकासासह ४.१ कोटी युवकांना नोकरीच्या संधी देण्यावर भर देण्यात आला आहे. सर्व क्षेत्रांमध्ये अतिरिक्त ३० लाख युवकांना नोकरी मिळवून देण्यासाठी दोन वर्षासाठी दरमहा ३००० रुपयांची तरतूद कर्मचारी सार्वजनिक निर्वाह निधीसाठी करण्याचा निर्णयही स्वागत आहे. याशिवाय देशातील पाच आयआयटीमध्ये ६५०० अतिरिक्त जागा निर्माण करण्यात येणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पुढाकाराने बेरोजगार निर्मूलनासाठी आणि कुशल मनुष्यबळ निर्मितीसाठी मोठा पुढाकार घेतला असला तरी या सर्व उपक्रमांमध्ये बेरोजगार तरुणांनी तसेच महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभागी होणे आवश्यक आहे. असे मत श्री. देशमुख यांनी व्यक्त केले.



साप्ताहिक नगर संकेतचे संपादक सत्येन मुथा यांनी काल उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांची भेट घेऊन त्यांनी प्रकाशित केलेले प्रा. डॉ. राजू रिक्कल यांचा प्रबंध ग्रंथ पवार यांना भेटीदाखल दिला. सदर प्रबंधाविषयी ना. अजित पवार यांनी जाणीवपूर्वक माहिती सत्येन मुथा यांच्याकडून घेतली.

# भिस्तबाग जि.प. शाळेत रंगला हळदी-कुंकू समारंभ



**समाचार/नगर-दि.४**

भिस्तबाग येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत माता पालक मेळाव्यात हळदी-कुंकू समारंभ उत्साहात पार पडले. या हळदी-कुंकू कार्यक्रमात महिला सक्षमीकरणाचा जागर करुन मुलांवर संस्कार घडविण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी महिलांसाठी विविध स्पर्धा पार पडल्या.

जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता काळे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या हळदी-कुंकूच्या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून माजी नगरसेविका शारदाताई ढवण, सहशिक्षिका शितल आवारे, सुरेखा वाघ, रोहिणी ससे, माधुरी चोथे, अनुजा घुले, अमृता वाघमारे, व्यवस्थापन समिती अध्यक्षा सरला ढवण, संगीता कजबे, ज्योती लाटे, अहिल्या सांगळे, योगिता वाघमारे, सविता काजळकर आदींसह माता पालक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

अनिता काळे म्हणाल्या की, महिला सक्षम झाल्यास समाजाचा विकास साधला जाणार आहे. तर मुलांवर संस्कार रुजविल्यास समाज घडणार आहे. मुलांना घडविताना शिक्षणाबरोबर संस्कार महत्त्वाचे आहेत. सावित्रीबाई फुले व राजमाता जिजाऊ यांचा वारसा चालविताना त्यांचा आदर्श समोर ठेऊन वाटचाल करण्याची गरज आहे. महिलांनी उंबरठा ओलांडून स्वत:चे कर्तृत्व सिध्द करण्याचे त्यांनी आवाहन केले.

या कार्यक्रमात महिलांचे उखाना स्पर्धा, संगित खुर्ची आदींसह विविध मनोरंजनात्मक स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत उत्स्फूर्तपणे सहभागी झाल्या होत्या. विद्यार्थ्यांनी आपल्या आईच्या विविध स्पर्धा पाहण्याचा आनंद लुटला. विजेत्या महिलांना बक्षीस देण्यात आले. यावेळी उपस्थित महिलांनी एकमेकींना हळदी-कुंकू लावून वाण दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शितल आवारे यांनी केले. आभार सुरेखा वाघ यांनी मानले.

# नगरच्या जिरायत भागात 'काळे'ज ऑर्किड रिसॉर्ट पर्यटन म्हणून पाहिले जाईल- पद्मश्री पोपटराव पवार

**समाचार/नगर-दि.४**

शिर्डी रोडवरील विळद येथे काळे' ज ऑर्किड रिसॉर्ट हे नगरच्या जिरायत भागात पर्यटन म्हणून पाहिले जाईल, असे प्रतिपादन पद्मश्री पोपटराव पवार यांनी केले.

ते नुकत्याच विळद येथील काळे'ज ऑर्किड रिसॉर्टच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलत होते. सीए ज्ञानेश्वर उर्फ राजेंद्र काळे यांच्या मातोश्री शांताबाई काळे व त्यांच्या कन्या सई व राजनंदिनी यांच्या हस्ते फीत कापून फटाक्यांच्या आतषबाजीत उद्‌घाटन झाले. माजी खा. सुजय विखे, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर, शाहीर विजय तनपुरे जि. प. सदस्य संदेश कार्ले, शिक्षक नेते आप्पा शिंदे, यांच्या प्रमुख उपस्थितीत हा दिमाखदार उद्घाटन सोहळा पार पडला. यावेळी पुढे बोलतांना पवार म्हणाले की, नगरकरांना आता महाबळेश्वर, लोणावळा- खंडाळा येथे जाण्याची गरज राहणार नाही. येथे त्या हिलस्टेशन सारखाच



थंडगार फील येत आहे.

माजी खा. सुजय विखे म्हणाले की, नाशिकच्या धर्तीवर बॅकवॉटरला जसे टुरिझम झाले आहे तसे विळदलाही पर्यटन वाढेल व त्यामुळे नगर शहरात पर्यटन वाढण्यास नक्की हातभार लागेल. या नाविन्यपूर्ण उपक्रमास ॲड. अभय आगरकर यांनी शुभेच्छा दिल्या.

प्रांताधिकारी सुधीर पाटील यांच्या हस्ते रिसॉर्टच्या वेबसाइटचे उद्‌घाटन करण्यात आले. या कार्यक्रमास मा. आ. दादाभाऊ कळमकर, प्रांताधिकारी सुधीर पाटील, उपजिल्हाधिकारी मनिषा राशिनकर, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष संपत बारस्कर, काँग्रेसचे शहराध्यक्ष किरण काळे, माजी अध्यक्ष दीप चव्हाण, जि. प. सदस्य शरद झोडगे, श्रीगोंद्याचे माजी नगराध्यक्ष मनोहर पोटे, माजी महापौर अभिषेक कळमकर, बाबासाहेब वाकळे, शीतल जगताप, वैशाली कोतकर, भाजप नेते वसंत लोढा, सदाशिव देवगावकर, ॲड. अच्युतराव पिंगळे, राजेंद्र गांधी, सचिन पारखी, राजेंद्र चोपडा इ. सह अनेक मान्यवरांनी या कार्यक्रमास भेटून शुभेच्छा दिल्या.

माजी नगरसेविका मनिषा बारस्कर-काळे यांनी सर्वांचे आभार मानले.

## रोटरी मिडटाऊनचा उपक्रम; निकाल जाहीर

# वक्तृत्व करंडक स्पर्धेत ४८ शाळांचा सहभाग

**समाचार/नगर-दि.४**

रोटरी क्लब अहमदनगर मिडटाऊनच्या वतीने अहिल्यानगर शहरात आयोजित करण्यात आलेल्या रोटरी मिडटाऊन शालेय वक्तृत्व करंडक स्पर्धेस जिल्यातील ४८ शाळांच्या हजार हून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सहभाग घेतला. दोन फेऱ्यांमध्ये झालेल्या या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीतील विजेत्यांमध्ये महाअंतिम फेरी पाईपलाईन रोड वरील मेरीलँड सभागृहात घेण्यात आली.

या स्पर्धेचा परितोषिक वितरण नुकतेच सिने अभिनेते मोहिनीराज गटणे व साहित्यिक संजय कळमकर यांच्या हस्ते झाले. यावेळी रोटरी क्लब अहमदनगर मिडटाऊनचे अध्यक्ष रो.अजय पिसुटे, सचिव रो.मार्लिन एलिशा, प्रोजेक्ट प्रमुख रो.ॲड.हेमंत कराळे,





रो.प्रा.किरण कारला, मिडास सुझुकीचे संचालक संदीप भापकर आदी उपस्थित होते.

संजय कळमकर यांची भाषणे झाली.

स्पर्धेचा निकाल - मराठी मध्यम इयत्ता पहिली ते चौथी गट प्रथम वेदांत मोरे पद्मभूषण बाळासाहेब भारदे हायस्कूल शेवगाव, द्वितीय सायली गिरी ज्ञानसंपदा स्कूल, तृतीय आरोही शिंदे भारदे हायस्कूल शेवगाव व उत्तेजनार्थ हुमेजा शेख भारदे हायस्कूल शेवगाव. पाचवी ते सातवी गट प्रथम सोहम वागस्कर जे एस एस गुरुकुल केडगाव, द्वितीय पृथ्वीराज पोटफोडे भारदे हायस्कूल शेवगाव, तृतीय श्रद्धा कोकाण तिलक जैन विद्यालय पाथर्डी व उत्तेजनार्थ आरुष बेडेकर रामकृष्ण इंग्लिश मीडियम स्कूल. इयत्ता आठवी ते दहावी गट प्रथम वरद लोखंडे अशोकभाऊ फिरोदिया इंग्लिश मीडियम स्कूल, द्वितीय प्रतीका डोंगरे ज्ञानसंपदा स्कूल, तृतीय वरद साखरे भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूल व उत्तेजनार्थ नाविन्य वाघुले महाराणी ताराबाई कन्या विद्यालय केडगाव.

इंग्रजी मध्यम शाळा अंतिम निकाल - पहिली ते चौथी गट प्रथम माही दोडेजा माउंट लिटरेला झी स्कूल, द्वितीय आराध्य अग्रवाल माउंट रेट्रीला स्कूल, तृतीय रेडन अहुजा व उत्तेजनार्थ ध्वज मनोज मुनोत. पाचवी ते सातवी गट प्रथम स्वयम शिंदे सेंट मायकल स्कूल, द्वितीय रिशिता ढवळे सेंट विवेकानंद स्कूल, तृतीय अर्जुन पुरी एक्झिलियन कॉन्व्हेंट स्कूल व उत्तेजनार्थ आर्वी मंडोरे माउंट लिटरेला झी स्कूल. आठवी ते दहावी गट प्रथम अपूर्वा नांदुरकर सेंट विवेकानंद स्कूल, द्वितीय दृष्टि ललवाणी सेंट विवेकानंद स्कूल, तृतीय श्रद्धा गौड चित्रकूट विद्यालय व उत्तेजनार्थ स्वरा बिडवे अशोक भाऊ फिरोदिया स्कूल.

# नागरदेवळे येथे गायत्री फाऊंडेशनचे रक्तदान शिबीर

**समाचार/नगर-दि.४**

रक्तदान हे सर्वात श्रेष्ठदान आहे. या दानाने परम सुख मिळतेच, पण आपल्या रक्तदानाचे एखाद्याचा जीव वाचतो, यासारखा आशिर्वाद नाही. त्यामुळे रक्तदानाविषयी जास्तीत जास्त जनजागृती होऊन तरुणांनी रक्तदान करावेत, असे आवाहन सरपंच रामभाऊ पानमळकर यांनी केले.

बुऱ्हाणनगररोड वरील नागरदेवळेफाटा येथील सप्तशृंगी मंदिरात गायत्री फाउंडेशन (ट्रस्ट) या सामाजिक संस्थेने अहिल्यानगर जनकल्याण रक्त केंद्राच्या माध्यमातून रविवारी (दि.२फेब्रुवारी२०२५) सकाळी १० वा. आयोजित रक्तदान शिबीराच्या अध्यक्षस्थानावरुन सरपंच रामभाऊ पानमळकर हे बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून भिंगार कॅन्टोन्मेंट



बोर्डाचे मानद सदस्य वसंतराव राठोड, समाजसेवक जालिंदर बोरुडे, युवानेते राकेश ताठे, निखिल शेलार, सागर निमसे पा., रेणुका कॅन्ट्रक्शनचे प्रमुख सचिन सुसे पा. आदींसह मान्यवर उपस्थित होते.

भिंगार कॅन्टोन्मेंट बोर्डाचे मानद सदस्य वसंतराव राठोड म्हणाले की, रक्तदानाचा कुंभ घेणे ही सोपी बाब नाही. जो कोणी हा रक्तदानाचा कुंभ घेतो, अथवा तो भरवितो. या रक्तदान कुंभामुळे अनेकांचे प्राण वाचवून तो एकप्रकारे अनेकांचे आशिर्वाद घेतो. म्हणूनच प्रत्येकाने विशेषतः तरुणांमध्ये रक्तदानाची जनजागृती व्हावी.

दरम्यान समाजसेवक जालिंदर बोरुडे, युवानेते सागर निमसे पा., राकेश ताठे, संस्थेचे विश्वस्त निशांत ढाकणे आदींसह मान्यवरांची भाषणे झाली.

प्रास्ताविक संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब ढाकणे यांनी केले.

# हंसतीर्थ स्वामी महाराजांच्या पादुकांचा पूजन-दर्शन सोहळा



**समाचार/नगर-दि.४**

संभाजीनगर येथील योगीराज हंसतीर्थ स्वामी महाराज यांच्या पादुकांचे अहिल्यानगर येथील सावेडी उपनगरात शिलाविहार येथे श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज मंदिरात स्वागत करून पूजन व दर्शन सोहळा पार पडला.

गोंदवलेकर महाराज यांच्या जन्मोत्सवानिमित्त येथे अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे. वसंत पंचमी निमित्त योगीराज हंसतीर्थ स्वामी महाराज यांच्या चरण पादुकांचे सावेडी उपनगरात सर्वत्र स्वागत होऊन पूजन करून दर्शनाचा लाभ भाविकांनी घेतला.

यावेळी अंबरीश महाराज, अनिरुध्द महाराज, भागवताचार्य नंदकुमार रामदासी, डॉ.अनिकेत घोटणकर, सुंदरदास रिंगणे, रेखा रिंगणे, अशोक मुळे, राम विधाते, राहुल लिमये उपस्थित होते. या पादुकांच्या पूजन सोहळ्या बरोबरच मंगळवार दि. ४ रोजी अहिल्यानगर येथील किस्त गल्लीतील श्री बालाजी मंदिरात सामुदायिक उपासक सोहळा सायंकाळी सहा ते आठ वाजता होणार आहे.

## अहिल्यादेवींचा त्रिशताब्दी जयंती उत्सव उत्साहात

# पोवाड्यातून उलगडला जीवनपट

**समाचार/जामखेड-दि.४**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जन्मशताब्दी निमित्ताने महाराष्ट्र राज्य सांस्कृतीक मंत्रालयाचे वतीने संपुर्ण महाराष्ट्रात आहिल्यादेवींचे कार्य पोहचावे म्हणुन तयार करण्यात आलेल्या आहिल्यादेवींच्या चित्ररथाचे जामखेड शहरात रविवारी जामखेड शहरात खर्डा चौकात आगमन झाले. यावेळी या चित्ररथाचे भाजप नेते व कार्यकर्त्यांनी जोरदार स्वागत केले. शाहीरांनी पोवाड्यातून अहिल्यादेवीचे जीवनपट उलगडून माहिती दिली.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा चित्ररथ जामखेड येथील खर्डा



चौकात रविवारी आल्यावर मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती. जेष्ठ नेते प्रा. मधुकर राळेभात व माजी सभापती डॉ भगवान मुरूमकर, भाजपा तालुकाध्यक्ष अजय काशिद, युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष बाजीराव गोपाळघरे, बाजार समितीचे सभापती शरद कार्ले, संजय काशिद यांच्या हस्ते पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या उपस्थित राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या मूर्तीला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. 'राजमाता अहिल्यादेवी होळकरांचा विजय' असो अशा घोषणांनी जामखेड शहर दुमदुमून गेले होते.

भाजपचे जेष्ठ नेते प्रा. मधुकर राळेभात यांचे भाषण झाले. यावेळी बाजार समितीचे सभापती पै.शरद कार्ले, माजी सभापती डॉ. भगवान मुरूमकर, भाजपा तालुकाध्यक्ष अजय काशिद, नगरसेवक डॉ ज्ञानेश्वर झेंडे, मोहन पवार, दिगंबर चव्हाण, तात्यासाहेब पोकळे, संजय काशिद, सुनिल यादव, नगरसेवक अमित जाधव, डॉ अल्ताफ शेख, ओबीसी तालुकाध्यक्ष विष्णू गंभीरे, प्रविण बोलभट, उध्दव हुलगुंडे, अर्जुन म्हेत्रे, राम पवार, प्रविण होळकर, कल्याण हुलगुंडे, संतोष गव्हाळे, शिवकुमार डोंगरे, शुभम हुलगुंडे, तुषार बोथरा, विजय कुलकर्णी, मासाळ सर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### प्रमोदसुधाजींच्या दीक्षादिनाच्या अमृत महोत्सवनिमित्त सोहळा

# आनंदधाममध्ये भक्तामर मंडळाचा महाकुंभ संपन्न

**समाचार/नगर-दि.४**

गुरूमाऊली पूज्य प्रमोदसुधा म.सा. यांच्या दीक्षादिनाच्या अमृत महोत्सवनिमित्त येथील आनंदधाममध्ये भक्तामर मंडळाचा महाकुंभ भक्तीपूर्ण वातावरणात संपन्न झाला. भक्तामर स्तोत्राच्या उच्चारणाने आनंदधाममधील वातावरण मंत्रमुग्ध झाले. या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी महाराष्ट्राच्या विविध ५४ भागांमधून ११०० च्या वर महिला आल्या होत्या.

आचार्य सम्राट पू.आनंदऋषीजी म.सा.यांच्या चरण स्पर्शाने पावन झालेल्या आनंदधाममधील या सोहळ्यास प्रवर्तक कुंदनऋषीजी म.सा. आणि प्रबुध्द विचारक आदर्शऋषीजी म.सा. यांचे मार्गदर्शन लाभले. अलोकऋषीजी, सत्यप्रभाजी, दिव्यदर्शनाजी यांची मोलाची साथ लाभली. उज्वल साध्वी परिवाराच्या पू.विश्वदर्शनाजी आणि पू.पुनितदर्शनाजी यांनी अथक परिश्रम घेत नियोजन केले. जैन धर्माचा ध्वज फडकावून या सोहळ्याचा शुभारंभ करण्यात आला. साध्वी विश्वदर्शनाजी यांनी मनोगत व्यक्त करताना नारी शक्ति धर्माचा आणि संसाराचा समतोल समर्थपणे सांभाळते. सामुहिक जपाच्या दिव्य शक्तीचा आनंद प्रत्येक महिला अनूभवत होती. एकत्रितपणे सामुहिक जप केल्याने विश्वशांती, राष्ट्रशांती लाभून आत्मानंद प्राप्त होतो.

नो कमेंटस्, नो कंप्लेट, नो कंपेरीझन या त्रिसूत्रीचा गुरू प्रसाद प्रवचनाच्या माध्यमातून उपस्थित महिलांना देण्यात आला. वीरस्तुतीचे पठण करताना प्रत्येकीला दिव्य शक्तीची अनुभूती मिळाली. साध्वी पुनितदर्शनाजींनी प्रश्नमंच स्पर्धा घेऊन उत्साह वृध्दींगत केला. श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ आणि तिलोकरत्न धार्मिक परिक्षा बोर्ड यांचे विशेष सहकार्य लाभले. पू.कुंदनऋषीजीं म.सा. चे पू.आदर्शऋषिजी यांच्या आशीर्वादाने आणि पू. गुरूदेवांच्या मंगलपाठाने या सोहळ्याची सांगता करण्यात आली. श्रीरामपूर येथील कोठारी पब्लिकेशनचे ललित कोठारी, आदेश चंगेडिया, पोपटलाल कटारिया, अशोक बलदोटा, नरेंद्र बाफना, राजेश बलदोटा, अरूण दुगड, आशिश मुथियान, संतोष पटवा, सचिन मुनोत, संगिता सुशिल बोरा (जामनेर), शरद कोकाटे अशा अनेकांचे मोलाचे सहकार्य लाभले. ज्योती गांधी (लोणी), मनिषा मुनोत, सपना पटवा ग्रुप, कोमल बोरा ग्रुप वर्धमान महिला मंडळ आदि महिलांनी कार्यक्रम नियोजनात मोलाचे योगदान दिले. यावेळी उपस्थित महिलांमधून ७५ लकी ड्रॉ काढण्यात आले. जय आनंद गुरू भक्त मंडळाने गौतम प्रसादीची सुरेख व्यवस्था केली होती. सामुहिक जपाच्या दिव्य शक्तीचा आनंद प्रत्येक महिला अनूभवत होती. एकत्रितपणे सामुहिक जप केल्याने विश्वशांती, राष्ट्रशांती लाभून आत्मानंद प्राप्त होतो.

### भारतीय स्वत्वाचा शोध धर्मपाल विचार कार्यक्रम

# परिवर्तनासाठी धर्मपाल विचारांची गरज - प्रभुणे

**समाचार/नगर-दि.४**

इंग्रज शिक्षण पद्धतीतून नोकरशाही तयार झाले.वसुधैव कुटुम्बकम्, आता विश्वात्मके देवे, हे सांगणारी आपली संस्कृती जगात सर्वश्रेष्ठ आहे.भारताला बदलायचे असेल तर धर्मपाल विचारांची गरज आहे.या सभागृहातून बाहेर पडल्यानंतर उपस्थित प्रत्येकाने आपापल्या परीने या विचारांना अनुसरून कृतिशील होण्याचा प्रयत्न करा असे आवाहन पद्मश्री गिरीश प्रभुणे यांनी केले.



सावेडी येथील माऊली सभागृह येथे पद्मश्री पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ अभ्यासक स्व.डॉ. प्रभाकर मांडे यांच्या प्रेरणेने भारतीय स्वत्वाचा शोध धर्मपाल विचार या कार्यक्रमात ज्येष्ठ विचारवंत धर्मपाल यांच्या ब्रिटिशपूर्व भारत कसे होते. या विषयावरील साहित्यावर संज्योत महाजन, वृषाली मांडे आणि अंजली दिवेकर या तिघींनी अतिशय अभ्यासपूर्ण व्याख्यान दिले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पद्मश्री पुरस्कार प्राप्त, सिद्धहस्त लेखक आणि सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री गिरीश प्रभुणे तर प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे संघचालक नानासाहेब जाधव, डॉ.रवींद्र साताळकर,स्नेहालय संस्थेचे संस्थापक गिरीश कुलकर्णी, आयोजक ऑप्टीमाईज्ड इंडिया या संस्थेचे अध्यक्ष संदीप महाजन आदींसह मान्यवर उपस्थित होते.

'भारतीय परंपरा' या पुस्तकातील विचार संक्षेपाने संज्योत महाजन यांनी १८ व्या शतकातील भारतीय परंपरांचा उल्लेख करतांना त्या काळातील आपली ग्रामस्वच्छता, शासनकर्ते आणि समाज यांच्यातील आपुलकीचे संबंध ,शिक्षणव्यवस्था, भारताची स्वयंपूर्णता आणि भारतात उपलब्ध असलेली विविध कौशल्ये यांची काही उदाहरणांसहित माहिती दिली. कार्यक्रमाचे आयोजन ऑप्टीमाईज्ड इंडिया या संस्थेचे अध्यक्ष संदीप महाजन यांनी केले होते.या कार्यक्रमाचे निवेदन लेखिका गौरी डोखळे यांनी केले तर आभार संदीप महाजन यांनी मानले.

### आयएमएसचा २३ वा नृत्य महोत्सव उत्साहात

# संस्थेची शास्त्रीय नृत्य संवर्धनात प्रभावी कामगिरी - अर्शीन मेहता



**समाचार/नगर-दि.४**

संस्थेच्या शास्त्रीय नृत्य अॅकॅडमीचा २३वा नृत्य महोत्सव १फेब्रुवारी रोजी माऊली सभागृह येथे पार पडला.याप्रसंगी प्रसिध्द बॉलीवूड अभिनेत्री सी.ए. अर्शीन मेहता प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. ५ वर्षे भरतनाट्यम नृत्याचे शिक्षण त्यांनी याच संस्थेमधून घेतले होते त्यामुळे अॅकॅडमीशी त्यांचं जवळचे नात आहे, आणि आज छोट्या छोट्या विद्यार्थिनींना नृत्य करताना पाहून त्यांच्या लहानपणीच्या आठवणी ताज्या झाल्या असे अर्शीन मेहता म्हणाल्या. पालकांना सल्ला देताना त्या म्हणाल्या की, मुलांना कोणत्या क्षेत्रात जास्ती रुची आहे ते ओळखा आणि त्यांना त्यांचं आयुष्य घडवू देत , अनेक अनुभव येतील त्यातूनच ते शिकत जातील. फक्त त्यांच्या प्रत्येक निर्णयाला तुम्ही खंबीरपणे त्यांच्या पाठीशी उभे राहा., असे सांगत त्यांनी स्वतःचेच उदाहरण दिले , मी सी ए होऊन मला अभिनयात करीयर करायचंय असं घरी विचारल्यावर वडिलांनी तिला परवानगी दिली.

संचालक डॉ.मेहता यांनी स्वागत केले संस्थेच्या समन्वयक डॉ . ऋचा तांदुळवाडकर यांनी प्रास्ताविक केले, सात विद्यार्थिनींपासून सुरू झालेली नृत्य संस्था आता अतिशय सुंदररित्या बहरत आहे . अनेक नवनवीन कोर्सेस यंदाच्या वर्षी सुरुवात करण्यात आले आणि त्याला भरभरून प्रतिसाद मिळत आहे, आगामी काळात अनेक गोष्टी विद्यार्थीनींच्या उन्नतीच्या दृष्टीने करायच्या ठरवलेल्या आहेत असं त्या म्हणाल्या. डॉ.शरद कोलते यांनी पाहिलेल स्वप्न आणि त्यांनी आखून दिलेल्या मार्गामुळे संस्था प्रगतीपथावर आहे असेही डॉ. ऋचा ह्यांनी नमूद केलं. संस्थेच्या प्राचार्या चैत्राली पांडे यांनी वर्षभरातील कामगिरीचा आढावा घेतला एप्रिल २०२४ च्या सत्रात गांधर्व परीक्षेत सर्व विद्यार्थिनी विशेष योग्यता व प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या, शास्त्रीय नृत्याची तोंडओळख करणारी कार्यशाळा, नृत्ययोगा, अलंकार परीक्षा, नटराज व घुंगरू पूजनाचा कार्यक्रम ह्या सर्वांविषयीचा सविस्तर अहवाल त्यांनी सादर केला. भरतनाट्यमच्या विद्यार्थिनींनी पुष्पांजली, नटेशकौतुवं, मधुराष्टकम्, शब्दम, देवी स्तुती, गणेश पंचरत्न ह्या नृत्य रचना सादर केल्या. लेडीज स्पेशल बॅचनी सादर केल्या गणेश स्तोत्रंला प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली. कथकच्या विद्यार्थिनींनी सरगम व राम भजन सादर करून प्रेक्षकांची वाहवा मिळवली. संस्थेच्या प्राचार्य चैत्राली पांडे, भरतनाट्यम नृत्य शिक्षिका आश्लेषा पोतदार व कथक नृत्य शिक्षिका उत्कर्षा दगडे ह्यांनी एकत्र भरतनाट्यम कथक नृत्य शिव स्तुतीपर सादर करून सर्वांची मने जिंकली. महोत्सवाची सांगता सर्व विद्यार्थिनींच्या शिव श्लोकमनी झाली. कार्यक्रमाचे निवेदन दिपाली चुत्तर व आश्लेषा पोतदार ह्यांनी केले.

# डॉ. कवडेंकडून जगतापांना पदके समर्पित

**समाचार/नगर-दि.४**




डॉ रवींद्र कवडे यांनी जागतिक कुस्ती सुवर्णपदक विजेते अंटालिया, टर्की जागतिक जागतिक कुस्ती ब्रॉन्झ पदक विजेते टोरंटो जागतिक कुस्ती स्पर्धेत ब्राँझ पथक संपादिले. महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या निमित्ताने अहिल्यानगर येथे उभारण्यात आलेल्या कै बलभीम आण्णा जगताप क्रीडा नगरीत जागतिक सुवर्णपदक आणि जागतिक कुस्ती पंचाची फी लापीन समर्पित केली. कवडे यांच्या अनेक कुस्त्या भारत तसेच विदेशात झाल्या. परंतु अहिल्यानगरच्या जवाहर स्टेडियम आताच्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेचे बलभीम जगताप स्टेडियम मधील कुस्त्यांनी त्यांना प्रेरणा व प्रोत्साहन दिले.

त्यांना प्राप्त झालेली जागतिक पदके माजी आमदार अरुण जगताप तसेच आमदार संग्राम जगताप महाराष्ट्र कुस्ती स्पर्धेचे आयोजक अरुण काका जगताप यांचे वडिलांना समर्पित केली. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते कार्यक्रम पार पडला. या प्रसंगी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे, विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे , महाराष्ट्र कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष रामदास तडस, हिंदकेसरी योगेश दोडके हजारो कुस्तीप्रेमींच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

अरुण जगताप, आमदार संग्राम जगताप यांनी महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे उत्कृष्ट आयोजन प्रित्यर्थ त्यांचा सत्कार डॉ रवींद्र कवडे, स्वातंत्र्य सैनिक तथा जागतिक कुस्ती सुवर्णपदक विजेते, प्रथम दर्जाचे आंतरराष्ट्रीय कुस्ती पंच, मॉस्को १९८० तथा लॉस एंजलिस १९८४, ऑलम्पिक चे निरीक्षक, २७ क्रीडा व शिक्षण विषयक पुस्तकांचे लेखक, परिश्रमपूर्वक संपादन केलेले अभूतपूर्व यश त्यांनी स्व. बलभीम आण्णा जगताप यांना समर्पित केले.

### नऊ दिवस सांस्कृतिक मेजवानी; शनिवारी समारोप

# 'सारडा' च्या स्नेहसंमेलनात कार्यक्रमांची रेलचेल

**समाचार/नगर-दि.४**



पेमराज सारडा महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनास उत्साहात सुरवात झाली आहे. यानिमित्ताने ९ दिवस महाविद्लयात भरगच्च कार्यक्रमांचे व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. स्नेहसंमेलनाचे उद्घाटन या वर्षीचे निमंत्रक प्रा.डॉ.शीलेश निकम यांच्या हस्ते संस्थेच्या ध्वजारोहणाने झाले. यावेळी प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित, उपप्राचार्य प्रा.गिरीश पाखरे व मिलिंद देशपांडे, प्रबंधक अशोक असेरी, प्रा.राजू रिक्कल, प्रा.सत्यजित पाटील आदींसह सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

वार्षिक स्नेहसंमेलनात ९ दिवस विविध कार्यक्रमांचे व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार दि. ८ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते १ या वेळत महाविद्यालयात फूड फेस्टिव्हल होणार असून दुपारी नृत्य, गायन, वादन, मिमिक्री असा विविध गुणदर्शनचा कार्यक्रम होणार आहे. सायंकाळी मान्यवरांच्या हस्ते वार्षिक पारितोषिक वितरणाने या स्नेहासंमेलाचा समारोप होणार आहे, अशी माहिती निमंत्रक प्रा.शीलेश निकम यांनी दिली. प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित म्हणाल्या, स्नेहसंमेलन हे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे हक्काचे व्यासपीठ आहे. रोजच्या अभ्यासाच्या ताणतणावामधून काहीकाळ विद्यार्थ्यांना मोकळीक मिळावी, विविध डेज् व स्पर्धांचा तसेच नाचगाण्याचा आनंद त्यांनी घ्यावा यासाठी सारडा महाविद्यालय दरवर्षी मोठ्या उत्सहात स्नेहसंमेलनाचे आयोजन करत आहे. सर्व विद्यार्थी व प्राध्यापक यात सहभागी होतात. स्नेहसंमेलनाच्या उद्घाटन निमित्त मुळची अमेरिकेतील पण सध्या सारडा महाविद्यालयाची विद्यार्थिनी गुनीवियर दार्मोट व उत्कर्ष दगडे या विद्यार्थिनींनी पारंपारिक नृत्य सादर केले.



# अर्थ विश्लेषक कपाडिया पुरस्काराने सन्मानित

**समाचार/नगर-दि.४**

मागील चार दशकांहून अधिक काळ पत्रकारितेत कार्यरत असलेले ज्येष्ठ अर्थ विश्लेषक पत्रकार प्रशांत कपाडिया यांना सचिवालय जिमखाना, मंत्रालय, मुंबई येथे झालेल्या शानदार सोहळ्यात पत्रकारिता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. अखिल भारतीय राज्य सरकारी कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष डॉ. के. गणेशन आणि राज्य सरकारी कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण यांच्या हस्ते आणि मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, ज्येष्ठ पत्रकार वसंत मुंडे यांच्या उपस्थितीत हा सत्कार सोहळा झाला.

प्रशांत कपाडिया गेली ४० वर्षे पत्रकारितेत आहेत. 'इन्व्हेस्टर गीता' या नियतकालिकातून त्यांनी आर्थिक विषयावरील पत्रकारिता सुरु केली. त्यानंतर देश-विदेशातील अनेक संस्थांचे तसेच राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय परिषदांमधून वार्तांकन करत आपला ठसा उमटवला. त्यांनी आर्थिक तसेच माध्यम सल्लागार म्हणूनही सहकार्य केले आहे.धीरुभाई अंबानी, राकेश झुनझुनवाला यांच्यासारख्या आर्थिक विषयातील अभ्यासक आणि व्यावसायिकांशी त्यांनी संवाद साधला असून त्यांचे विचार वाचकांपर्यंत पोहचवले आहेत. आर्थिक विश्लेषक तसेच गुंतवणूक सल्लागार म्हणून त्यांनी सामाजिक सेवा केली आहे.

### नगरच्या नताशाने घेतले चेन्नईत नृत्याचे धडे

# दूरदर्शनवर सादर केला भरतनाट्यम नृत्याविष्कार

**समाचार/नगर-दि.४**

नगरच्या प्रसिद्ध गायिका व नृत्यांगना नृत्यगुरु नृत्यतपस्वी वर्षा पंडित तसेच नगरचे ज्येष्ठ संगीत समीक्षक चंद्रकांत पंडित यांची कन्या नताशा हिचा चेन्नई दूरदर्शन वर नृत्याचा विशेष कार्यक्रम नुकताच सादर झाला . नताशाने गेल्या १३ वर्षांपासून चेन्नई येथे राहून भरतनाट्यम नृत्यात प्रावीण्य मिळवले आहे.

नगरमधून नृत्य विशारद झाल्यानंतर चेन्नई येथील ' कलाक्षेत्र फाउंडेशन ' या जगविख्यात असलेल्या संस्थेमधून पदवी घेतली .त्यानंतर चेन्नईतील प्रसिद्ध नृत्यगुरू शिजीत कृष्ण यांच्या नामांकित सहृदय फाउंडेशन संस्थेत भरतनाट्यम नृत्य तसेच गायन, वादनाचे पुढील प्रगत शिक्षण घेतले व गेली पाच वर्ष त्याच संस्थेत नृत्य अध्यापक म्हणून कार्यही करत आहे. तसेच ती नृत्याचे ऑनलाईन क्लासेस पण घेते त्यात तिच्याकडून देश विदेशातील विद्यार्थी देखील भरतनाट्यमचे तंत्र शुद्ध शिक्षण घेत आहेत.

दिनांक २८ जानेवारी रोजी तिचा चेन्नईच्या दूरदर्शन चॅनलवर एकल नृत्याविष्कार प्रसारित झाला व नंतर त्याच कार्यक्रमाचा दुसरा एपिसोड दिनांक ३० जानेवारी रोजी प्रसारित झाला. गेल्या वर्षीही विद्या भवन मैलापुर येथे एकल नृत्याचे सादरीकरण झाले होते आणि त्याची खूप प्रशंसाही झाली होती व रसिकांचा त्यास उदंड प्रतिसाद मिळाला होता. नताशाचे आजवर तिच्या गुरुंसमवेत चेन्नई, केरळ , बेंगलोर , गोवा ,मुंबई , म्हैसूर , ऊटी, पुणे असे अनेक ठिकाणी नृत्याचे कार्यक्रम झाले आहेत . नगरासारख्या छोट्याशा शहरातून चेन्नईसारख्या मेट्रोसिटीमध्ये जाणे , आपल्या घरापासून लांब १३ वर्ष तिथे राहणे , तिथली भाषा शिकून घेऊन, तिथल्या संस्कृतीशी एकरूप होणे , तिथल्या कलेची, नृत्याची संस्कृती आत्मसात करून त्यात प्रावीण्य मिळवणे ,सर्व गुरुजन ,व समीक्षकांच्या पसंतीस उतरणे आणि आज नॅशनल दूरदर्शन वर नृत्याचा एकल नृत्याविष्कार सादर करणे इथपर्यंतचा हा प्रवास इतरांसाठी खूप प्रेरणादायी आहे .

आजपर्यंत नगरच्या सांस्कृतिक परंपरेत अनेक मान्यवर कलाकारांनी दूरदर्शन वर आपल्या संगीत कलेचे सादरीकरण केले आहे .त्या यादीत आता भरतनाट्यम नृत्यासाठी कुमारी नताशा हीच्या नावाचा समावेश झाला आहे ही बाब नगरकरांसाठी नक्कीच अभिमानास्पद आहे. नृत्याच्या क्षेत्रात तिने आमचेच नव्हे तर नगरचे नाव मोठे केले आहे असे प्रतिपादन विद्यालयाचे सह संचालक श्री चंद्रकांत पंडित यांनी केले.



शेंदूर, गुलाल, कुंकू, भंडारा, भाजकी (काळी) माती, क्रिस्ट्रल रांगोळी, कलर रांगोळी, मीठ, नुडल्स, बांधकाची रांगोळी

डागा
शांतीलाल डागा

दाळमंडई/मार्केट यार्ड, अ. नगर, ७५८८११५१५७/ ९८२२०८१४४०



आपल्या उज्ज्वल भविष्यासाठी आजच गुंतवणूक करा

व्ही गार्डचा सोलार वॉटर हिटर घेऊन या..
वीज बिलात बचत करून आपले भविष्य सुरक्षित करा...




SS 304 L टँक
उत्तम दर्जाचे PUF इन्शुलेशन
60 LS 5000 LPD उपलब्ध प्रेशराइज्ड मॉडेल्स उपलब्ध

देशात सर्वाधिक विक्री होणारे व्ही गार्ड सोलार वॉटर हिटर

V-GUARD®
Solar Water Heater

– अधिकृत विक्रेते –
प्रोप्रा. मिलिंद गंधे

आदित्य
एन्टरप्रायजेस्
गुलमोहोर रोड, सावेडी, अ. नगर. 9325103781

(*अटी लागू)


## ग्रामपंचायत कार्यालय, एरंडगाव समसूद ता.शेवगाव, जि.अहिल्यानगर

जा.क्र.८६/२०२५ जाहीर निविदा सन : २०२४-२०२५

ग्रामपंचायत कार्यालय, **एरंडगाव समसूद, ता.शेवगाव, जि.अहिल्यानगर** येथील १५ वा वित्त आयोग व ग्रामनिधी मधील प्राप्त निधीतून कामे सिलबंद जाहीर निविदा सूचना बी-१ साठी जि.प.नोंदणीकृत सु.बे.अ.वर्ग ठेकेदार यांच्याकडून काम पूर्ण करुन घेण्यासाठी मागवण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | कामाचे अंदापत्रकीय रक्कम रुपये | १% बयाणा रक्कम | निविदा संच फी | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | १५ वा वित्त आयोग अंगणवाडी क्र.४४ इमारत समोर पेव्हिंग ब्लॉक बसविणे | ५९,१४४/- | ५९१/- | २३६/- | ६ महिने |
| २ | १५ वा वित्त आयोग जलशुद्धीकरण यंत्रासाठी गाळा बांधकाम करणे | २,५४,१६३/- | २५४२/- | २३६/- | ६ महिने |
| ३ | ग्रामनिधी ग्रामपंचायत कार्यालयासाठी इन्व्हर्टर खरेदी करणे. १) EXIDE,Inverter magic 1625 VA. 24 volt. 4 Years Warranty, २) EXIDE, Battery 200 AHx2.3 Years Guaranty / Warranty | ५०,०००/- | - | - | १ महिना |
| ४ | ग्रामनिधी १०% महिला बालकल्याण अंगणवाडीसाठी २.५ बाय ५ ऑफिस टेबल खरेदी करणे. २ नग | १२,९००/- | - | - | १ महिना |
| ५ | ग्रामनिधी १०% महिला बालकल्याण अंगणवाडीसाठी नीलकमल खुर्ची खरेदी करणे. १२ नग | १२,०००/- | - | - | १ महिना |

**टीप :** १) कोऱ्या निविदा मिळण्याचा कालावधी दि. ०५-०२-२०२५ ते ११-०२-२०२५ सकाळी १० ते सायं. ५ वाजेपर्यंत राहील. २) भरलेल्या निविदा स्वीकारण्यासाठी अंतिम दि.११-०२-२०२५ सायं. ५ वाजेपर्यंत ठिकाण ग्रामपंचायत कार्यालय एरंडगाव समसूद. ३) निविदा उघडण्याचा गुरुवार दि.१३-०२-२०२५ रोजी सकाळी ११.00 वाजता ४) निविदा संदर्भातील अटी व शर्ती तसेच लिफाफा क्र. १ व २ ची माहिती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळतील. ५) निविदा फॉर्म सोबत नोंदणी प्रमाणपत्र, जी.एस.टी.नंबर, पॅन कार्ड नंबर हे सादर करावेत. ६) जि.प.अहिल्यानगर यांच्याकडील नोंदणीकृत प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्र ७) निविदा मंजूर व नामंजूर अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचा अधिकार ग्रामपंचायत एरंडगाव समसूदने राखून ठेवला आहे.

**ग्रामपंचायत अधिकारी / सरपंच**
**ग्रामपंचायत कार्यालय, एरंडगाव समसूद ता.शेवगाव, जि.अहिल्यानगर**


टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात

दि.३१/०१/२०२५ ते दि.०६/०२/२०२५



DEVA (हिंदी)
07.45 AM 09.15 AM 10.45 AM
01.45 PM 02.30 PM 04.45 PM
07.45 PM 10.45 PM

SKY FORCE (हिंदी)
09.30 AM 12.00 PM 05.30 PM
08.00 PM 10.30 PM

ILU ILU 1998 (हिंदी)
04.15 PM

मुक्काम पोस्ट देवाचं घर (मराठी)
02.00 PM

JOURNEY (हिंदी)
12.15 PM

फसक्लास दाभाडे (मराठी)
06.30 PM

PUSHPA RELOAD
09.30 PM

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher *
- Offer Vaild On Window Booking & Phone Booking
Ahilyanagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse

AVAILABLE ON book my show | CONNPLEX | AVAILABLE ON book my show

3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002


"हर काम देश के नाम"

## अहमदनगर छावनी परिषद

एएमएक्स चौक, कैम्प भिंगार, अहमदनगर - ४१४००२
Email : ahmedngrcantt@gmail.com Website: ahmednagar.cantt.gov.in

पत्र सं. अहम/राजस्व/टी-१/त्रि. कर निर्धारण/२०२४-२५/ दि. ३/२/२०२५

### जाहीर नोटीस

अहमदनगर छावनी क्षेत्र के सभी संपत्ति धारकों को सूचित किया जाता है कि, सभी संपत्तियों का त्रैवार्षिक मूल्यांकन मूल्य २०२५-२०२८ (**Triennial Assessment**) इस साल के लिए किया जा रहा है। इसलिए छावणी परिषद ने संशोधित सूची का निर्माण किया है, अपनी संपत्ति का कर योग्य मूल्य अवलोकनार्थ छावणी परिषद कार्यालय में कार्यालय समय के दौरान यह नोटिस प्रकाशन की तारीख से तीस (३०) दिनों के लिए यह संशोधित सूची उपलब्ध रहेगी।

जो संपत्ति धारक अपनी संपत्ति के उक्त त्रैवार्षिक मूल्यांकन से सहमत नहीं हैं ऐसे संपत्ति धारक इस सार्वजनिक सूचना के प्रकाशन से तीस (३०) दिनों के भीतर अपनी आपत्ति विवरण सहित लिखित रूप में छावनी परिषद कार्यालय, अहमदनगर में जमा करे। कृपया ध्यान दें कि समय सीमा समाप्ती के पश्चयात, प्राप्त आपत्तियों पर किसी भी प्रकार से विचार नहीं किया जाएगा।

प्राप्त आपत्तियों को व्यक्तिगत रूप से सुना जाएगा और उक्त संशोधित त्रैवार्षिक मूल्यांकन मूल्यों को अंतिम मंजूरी दी जाएगी। सभी संपत्ति धारकों को सूचित किया जाता है कि अंतिम मंजूरी उपरांत कर योग्य मूल्य में किसी भी तरह की सुधारणा नहीं कि जाएगी।

sd/-
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**छावणी परिषद, अहमदनगर**


## पाहिजेत

अहमदनगर येथील नामांकित फर्मसाठी सेल्स मॅनेजर कम अकौंटंट पाहिजे. कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक. M/F चालेल.

मो. नं. 9763772242

## घर विकणे आहे

गुलमोहर रोड, सावेडी येथे दोन मजली ६ रूम, २ किचन, २ संडास-बाथरूम, २ बाल्कनी किंमत ५१ लाखांत अर्जंट विकणे आहे

9890103648
7768003126

## विकणे आहे

१) ऑफिससाठी/ दुकानासाठी उपयुक्त पार्टीशन साईज 9X6.5' आणि 7X7.25'
२) ऑफिस टेबल - 4.7'X2.4'
३) ऑफिस टेबल - 3'X2'

मो. नं. 9860046338




तृतीय
पुण्यस्मरण

सावली आम्हाला दिली वटवृक्षाप्रमाणे
शिक्षा आम्हाला दिली अविरत सेवेची..
कर्तृत्व आम्हाला शिकवले स्वकष्टाचे..
आदर्श आम्हाला दिले सद्विचारांचे

तुमच्या प्रेमळ स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली !

ह.भ.प. गं.भा. लक्ष्मीबाई शांतानंद डोके
स्व. वा.माघ शु. ४ शके १९४३
शुक्रवार दि. ४-२-२०२२

• शोकाकुल •
बापुसाहेब डोके व
समस्त डोके पाटील परिवार

kalika

## ग्रामपंचायत कार्यालय कोल्हार बु, ता. राहाता जि. अहिल्यानगर

निविदा नोटीस (प्रपत्र-१)

जाहीर निविदा अंतर्गत निविदा सूचना क्र. ग्राप/वर्ग म.स.सं./०१/कॉल-१/सन २०२४-२५ दिनांक ०४/०२/२०२५

नोंदणीकृत मजूर संस्था /सु.बे. नोंदणीकृत अभियंता/ विक्रेत्यांकडून **ग्रामपंचायत कार्यालय कोल्हार बु, ता. राहाता, जि.अहिल्यानगर** येथे पुढील काम परसेंटेज (टक्के) दराने घ्यायचे आहे. कामाचा तपशील पुढे दिलेला आहे. १. सदर कामाचे कोरे निविदा अर्ज दि. ०४/०२/२०२५ ते १०/०२/२०२५ या कालावधीत **ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी कोल्हार बु, ता. राहाता, जि. अहिल्यानगर** यांच्या कार्यालयात सकाळी १०.00 ते सायं.५.00 कार्यालयीन कामाच्या वेळेत (सर्व सुट्टी वगळून) मिळतील. २. निविदा दि. ११/०२/२०२५ रोजी सकाळी ११.00 नंतर उघडल्या जातील. ३. सदर कामाचे कोणतेही दरपत्रक किंवा सर्वच दरपत्रके नाकारण्याचा अधिकार व उशिरा आलेले कोणतेही दरपत्रक मंजूर किंवा नामंजूर करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे. तसेच अटीयुक्त व त्रुटीयुक्त दरपत्रक फेटाळण्यात येईल याची नोंद घ्यावी.

| अ. नं. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | बयाणा रक्कम | कोऱ्या निविदा संचाची कि. रु. | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे कोल्हार बु. ता. राहाता अंबिकानगर येथे ड्रेनेज बांधकाम करणे. | १५वा वित्त आयोग ग्रा. पं. स्तर | २५४००७/- | १ टक्का | २४०/- | खुला |

**टीप -** निविदा संबंधी अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळतील. निविदा व अटी व शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदांपैकी किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे.

**ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी/सरपंच**
**ग्रामपंचायत कोल्हार बु, ता. राहाता, जि. अहिल्यानगर**

## ग्रामपंचायत कार्यालय दाढ बु, ता. राहाता जि. अहिल्यानगर

निविदा नोटीस (प्रपत्र-१)

जाहीर निविदा अंतर्गत निविदा सूचना क्र. ग्राप/वर्ग म.स.सं./०१/कॉल-१/सन २०२४-२५ दिनांक ०४/०२/२०२५

नोंदणीकृत मजूर संस्था /सु.बे. नोंदणीकृत अभियंता/ विक्रेत्यांकडून **ग्रामपंचायत कार्यालय दाढ बु, ता. राहाता, जि.अहिल्यानगर** येथे पुढील काम परसेंटेज (टक्के) दराने घ्यायचे आहे. कामाचा तपशील पुढे दिलेला आहे. १. सदर कामाचे कोरे निविदा अर्ज दि. ०४/०२/२०२५ ते १०/०२/२०२५ या कालावधीत **ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी दाढ बु, ता. राहाता, जि. अहिल्यानगर** यांच्या कार्यालयात सकाळी १०.00 ते सायं.५.00 कार्यालयीन कामाच्या वेळेत (सर्व सुट्टी वगळून) मिळतील. २. निविदा दि. ११/०२/२०२५ रोजी सकाळी ११.00 नंतर उघडल्या जातील. ३. सदर कामाचे कोणतेही दरपत्रक किंवा सर्वच दरपत्रके नाकारण्याचा अधिकार व उशिरा आलेले कोणतेही दरपत्रक मंजूर किंवा नामंजूर करण्याचा अधिकार या कार्यालयाने राखून ठेवला आहे. तसेच अटीयुक्त व त्रुटीयुक्त दरपत्रक फेटाळण्यात येईल याची नोंद घ्यावी.

| अ. नं. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | बयाणा रक्कम | कोऱ्या निविदा संचाची कि. रु. | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे दाढ बु. ता. राहाता येथे बंदिस्त आर.सी.सी. गटार बांधकाम करणे. | ग्रामनिधी | २११६४४/- | सूट | २४०/- | सु.बे. |

**टीप -** निविदा संबंधी अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालयात पहावयास मिळतील. निविदा व अटी व शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदांपैकी किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे.

**ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी/सरपंच**
**ग्रामपंचायत दाढ बु, ता. राहाता, जि. अहिल्यानगर**




# पाउले चालती... सहकाराची वाट..

बुधवार दि. ५ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ९.०० वा. शुभारंभ

## भव्य सहकार दिंडी

सहकाराच्या पंढरी... चालले पतसंस्थांचे वारकरी

**सहकार दिंडीचा मार्ग**
छ.शिवाजी महाराज पुतळा, माळीवाडा, माणिकचौक, कापडबाजार, आडतेबाजार, बंगालचौकी

**दिंडीचा समारोप मार्केटयार्ड, अ.नगर येथे होईल.**

आंतरराष्ट्रीय सहकारवर्ष २०२५ निमित्त शिर्डी येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय सहकार परिषद याच्या स्वागतार्थ व सहकाराच्या वारकऱ्यांच्या सन्मानार्थ आपल्या शहरात सहकार दिंडीचे भव्य स्वागत व शोभा यात्रा संपन्न होत आहे. आपण सर्वांनी उत्साहात या दिंडीचे स्वागत करून यात सहभागी व्हावे ही जाहीर व नम्र विनंती.

दिंडीचे प्रमुख अतिथी व मार्गदर्शक

* आयोजक व विनित *







पद्मश्री पोपटराव पवार | गणेश पुरी साहेब, अ.नगर जिल्हा उपनिबंधक | वसंत लोढा, अध्यक्ष, नाशिक विभागीय पतसंस्था फेडरेशन | सुरेश वाबळे, अध्यक्ष, मल्टीस्टेट राष्ट्रीय फेडरेशन | काकासाहेब कोयटे, अध्यक्ष, राज्य पतसंस्था फेडरेशन

* स्वागतोत्सुक *
महाराष्ट्र शासन सहकार विभाग आणि शहर व जिल्ह्यातील विविध पतसंस्थांचे चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक मंडळ, व्यवस्थापक व कर्मचारी वृंद

* प्रमुख उपस्थिती *

श्री. प्रशांतराव गायकवाड, श्री. किसनराव लोटके, श्री. बाळकृष्ण काळे, श्री. प्रशांत भालेराव, श्री. वासुदेव काळे, श्री. कडुभाऊ काळे, श्री. शिवाजी कपाळे, श्री. वसंतराव कवाद, श्री. अजिनाथ हजारे, श्री. ज्ञानदेव पाचपुते, श्री. उमेश मोरगांवकर, श्री दत्तात्रय गावडे, सौ. सुशिलाताई नवले, श्री. पुखराज पिपाडा, श्री. वाडकर सर, श्री. रवीकाका बोरावके, श्री. विठ्ठलराव अभंग

Dishan

आंतरराष्ट्रीय सहकार परिषद व शहरात येणाऱ्या सहकार दिंडीनिमीत्त आमच्याही शुभकामना...

**धनसंपदा नागरी सह. पतसंस्था**
एम.आय.डी.सी., अ.नगर
चेअरमन/व्हा.चेअरमन/संचालक मंडळ

**याज्ञवल्य नागरी सह. पतसंस्था**
लक्ष्मीकारंजा, अ.नगर
चेअरमन/व्हा.चेअरमन/संचालक मंडळ

**श्री लक्ष्मीनारायण नागरी सह. पतसंस्था, बागडपट्टी**
चेअरमन - सौ. मिनल बोरा
व्हा. चेअरमन - सौ. स्वाती गुंदेचा

**समता नागरी सह. पतसंस्था**
चेअरमन - काकासाहेब कोयटे
कोपरगांव, अ.नगर

**श्री संत सावतामाळी ग्रामीण बिगरशेती सह. पतसंस्था**
पिंपळगांव माळवी, अ.नगर
चेअ. - रमशे गायकवाड / व्हा. चेअ. - नवनाथ आढाव